


महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

शनिवार, दि. २८ फेब्रुवारी २०२६




मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०९६ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com | Gmail : punegavkari@gmail.com

# रोहित पवारांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

## अजितदादांच्या अपघाताची पारदर्शक चौकशीसाठी धाव; देवगिरीवर स्मारकाचीही मागणी



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेची चौकशी सुरू असून केंद्रीय अन्वेषण संस्थेनेही याबाबत माहिती दिली आहे. मात्र या प्रकरणात ज्या कंपनीच्या विमानात त्यांचे अपघाती निधन झाले, त्या कंपनीवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी ठाम मागणी आमदार रोहित पवार यांनी केली आहे. रोहित पवार यांनी युगेंद्र पवार आणि कार्यकर्त्यांसह बारामती पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार नोंदवण्याचा प्रयत्न केला. तथापि, पोलिसांनी संबंधित कंपनीवर गुन्हा दाखल करण्यास नकार दिल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली. या घडामोडीनंतर त्यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांची भेट घेत दुर्घटनेबाबत सविस्तर चर्चा केली. त्यानंतर त्यांनी विधिमंडळ सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेतली. राज्य सरकारचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असल्याने सर्वच मंत्री आणि नेते विधिमंडळात उपस्थित आहेत. या पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी हा विषय पुन्हा जोरकसपणे मांडला. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रातील जनतेच्या मनात ज्या शंका निर्माण झाल्या आहेत, त्या शंका मुख्यमंत्र्यांसमोर मांडण्यासाठीच ही भेट घेतली. त्यांच्या म्हणण्यानुसार, विविध अभ्यासपत्रे आणि कागदपत्रे त्यांच्या हातात आली असून ती त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केली आहेत. देशात सध्या भारतीय जनता पक्षाचे सरकार असल्याने, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी देशाचे गृहमंत्री किंवा वरिष्ठ नेत्यांपर्यंत हा मुद्दा पोहोचवावा, अशी मागणी त्यांनी केली. चौकशी पूर्णपणे पारदर्शक व्हावी, कोणतीही बाब दडपली जाऊ नये, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. आणखी काही कागदपत्रांची मागणी मुख्यमंत्र्यांनी केली असून ती लवकरच दिली जाईल. त्यानंतर गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. केंद्र सरकारकडून चौकशी अहवाल येण्याची अपेक्षा असून उद्यापर्यंत तो प्राप्त होईल, असे रोहित पवार म्हणाले. मात्र कोणताही उडताउडतीचा अहवाल स्वीकारला जाणार नाही, तर सविस्तर आणि तपशीलवार अहवालच हवा, असा त्यांनी इशारा दिला. सोमवारी सकाळी अकरा वाजता ते सविस्तर पत्रकार परिषद घेऊन आणखी काही बाबी जनतेसमोर मांडणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या दुर्घटनेतील प्रत्येक पैलू समोर यावा आणि जबाबदारी निश्चित व्हावी, यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. बारामतीमध्ये गुन्हा नोंदवावा अशी त्यांची इच्छा होती. मात्र गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन त्यांनी मरीन ड्राईव्ह येथे जाऊन तक्रार करण्याचा प्रयत्न केला. नवीन कायद्यानुसार प्रथम माहिती अहवाल नोंदवता यावा, अशी अपेक्षा होती; परंतु तेथेही गुन्हा दाखल झाला नाही.









# अधिवेशनात दारू व अमली पदार्थवर चर्चा

## पण ओतूर नरूळ सिरसमणी खुलेआम दारू विक्री!



**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

ओतूर नरूळ सिरसमणी व परिसरात डांबरी रस्त्यावर खुलेआम देशी विदेशी दारू विक्री. राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अमली पदार्थ व बेकायदेशीर दारू विक्रीवर कडक कारवाई करण्याची मागणी जोर धरत असताना, प्रत्यक्षात नाशिक जिल्ह्यातील कळवण तालुका हद्दीत वेगळीच वास्तवता दिसून येत आहे. ओतूर व नरूळ खोऱ्यासह आजूबाजूच्या परिसरात थेट डांबरी रस्त्याच्या कडेला दिवसभर देशी-विदेशी दारूची खुलेआम विक्री सुरू असल्याचे स्थानिक नागरिक सांगत आहेत.

एकीकडे विधानसभेत आमदारांकडून दारू व अमली पदार्थांविरोधात कठोर भूमिका मांडली जाते, तर दुसरीकडे ग्रामीण भागात प्रशासनाच्या नजरेसमोरच नियमांची पायमल्ली होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. विशेषतः शाळा-कॉलेजला जाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आणि शेतमजुरी करणाऱ्या कुटुंबांच्या वस्तीच्या आसपासच ही विक्री सुरू असल्याने पालकवर्गात तीव्र संताप व्यक्त होत आहे.

स्थानिकांचा आरोप आहे की उत्पादन शुल्क विभागाचे काही कर्मचारी महिनाअखेरीस ठराविक हप्ते गोळा करण्यासाठी येतात; मात्र जे दारू विक्री व्यवसायिक हप्ता देत नाहीत त्यांच्यावरच छापे टाकण्याची पद्धत रूढ झाल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. अधिकाऱ्यांशी काही दारू व्यावसायिकांचे साटेलोटे असल्याच्या कुजबुजेमुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

जर हे आरोप खरे असतील, तर हा प्रकार केवळ बेकायदेशीर व्यापारापुरता मर्यादित नसून तो कायद्याच्या अंमलबजावणीवरील लोकांचा विश्वास डळमळीत करणारा आहे. शासन एकीकडे महसूल वाढवण्याच्या आणि व्यसनमुक्तीच्या घोषणा करत असताना, ग्रामीण रस्त्यांवर उघडपणे दारू विक्री होणे ही गंभीर विसंगती ठरते. ओतूर-नरूळ खोऱ्यातील अनेक महिलांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले की, दारू सहज उपलब्ध असल्याने कुटुंबातील कमावत्या व्यक्तींचे व्यसन वाढत आहे. याचा थेट परिणाम घरगुती कलह, आर्थिक ताण आणि मुलांच्या शिक्षणावर होत आहे. काही ठिकाणी तर दारू पिऊन वाहन चालवण्याच्या घटना वाढल्याने अपघातांचाही धोका निर्माण झाला आहे.

### प्रशासनाने स्पष्ट भूमिका घ्यावी

स्थानिक ग्रामस्थांची मागणी आहे की संबंधित विभागाने तात्काळ संयुक्त पथक तयार करून ओतूर, नरूळ आणि परिसरातील सर्व अनधिकृत विक्री केंद्रांवर निष्पक्ष कारवाई करावी. तसेच, जर कोणत्याही अधिकाऱ्यांचा संगनमत सिद्ध झाले, तर त्यांच्यावरही कठोर शिस्तभंग कारवाई व्हावी. राज्याच्या अधिवेशनात होणाऱ्या चर्चांना खऱ्या अर्थाने वजन यावे.

# 'अगस्ति कनिष्ठ महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा'

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



अकोले येथील अगस्ति कला वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय अकोले या महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिन उत्साहात व आनंदात साजरा झाला. विद्यार्थ्यांनी गवळणी,गीत गायन व काव्य वाचन करून मराठी भाषा गौरव दिन आनंदात साजरा केला. प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. नितीन आरोटे यांनी "मराठी भाषेतील छत्रपती शिवाजी महाराजांचे योगदान" या विषयावर विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले. 'कथाकथनाच्या' माध्यमातून प्रा. रविंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांचे व उपस्थितांचे मनोरंजन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. चांगदेव डोंगरे होते. यांनी 'मनातील भावना विचार व्यक्त करण्यासाठी मातृभाषेशिवाय दुसरी कुठलीच प्रभावी भाषा होऊच शकत नाही. असे सांगून विद्यार्थ्यांना मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती पर्यवेक्षक विवेककुमार वाकचौरे,कला शाखेचे समन्वयक प्रा. सुनील टिकल,प्रा. विकास निमसे, प्रा. संदीप नवले,प्रा. शिवाजी बुरके, , प्रा. सचिन चासकर, प्रा. महेश पाडेकर, प्रा. जगधने, प्रा. संतोष आवारी, प्रा. मोहिनी शिंदे,प्रा. ललिता घोडके, प्रा.जाधव मॅडम व सहकारी प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुनील साबळे यांनी केले सूत्रसंचालन प्रा. नंदा डफाळ यांनी केले तर आभार प्रा. दीपक वाकचौरे यांनी मानले.

# राहुरीत महिलांसाठी विविध कार्यक्रमांची आयोजन

**राहुरी: (समर्थ गांवकरी)**

८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने राहुरी नगरपालिका व महिला बाल कल्याण समितीच्या वतीने राजमाता जिजाऊ जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. महिला दिनाचा कार्यक्रम माजी नगराध्यक्षा डॉ सौ उषाताई तनपुरे व ओजस्विनी पतसंस्थेच्या संस्थापक चेअरमन सौ सुजाता तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली यावेळी आयोजित करण्यात आला असून प्रथमच महिलांसाठी मॅरेथॉन स्पर्धा, क्रिकेट स्पर्धेसह विविध डान्स, रील कॉम्पिटेशन आदि स्पर्धेचे तसेच बचत गटाच्या स्टॉल ही उभारण्यात येणार आहे . महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तूना बाजार उपलब्ध करून त्याचेही आयोजन करण्यात आले असून सर्व कार्यक्रम सौ भागीरथीबाई तनपुरे माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रांगणात होणार आहे. या सर्व स्पर्धेमध्ये शहरातील महिला युवती यांनी सहभागी होण्याचे आवाहन महिला बाल कल्याण समितीच्या सभापती सौ स्मिता भारत भुजाडी व सर्व समितीच्या सदस्यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती देताना सभापती सौ स्मिता भुजाडी म्हणाल्या की जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ६ दिवस भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून सदर महिला दिनाच्या कार्यक्रमाचे निमित्ताने शहरातील व तालुक्यातील महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी बचत गटाचे स्टॉल उभारण्यात येणार असून त्यासाठी बचत गटानी आपली स्टॉलची नावनोंदणी नगरपरिषद कार्यालयातील व्ही के राऊत व राहिज मॅडम यांचेकडून करावी. तसेच महिला दिनानिमित्त आयोजित केलेल्या मॅरेथॉन स्पर्धेसाठी नाव नोंदणी तेजा राणी शिंगी व नगरसेविका सौ प्रियांका आहेर यांचेकडे तसेच क्रिकेट स्पर्धेसाठी नाव नोंदणी हर्षा पटेल व हनी पटेल यांचेकडे त्वरित करावी.

तरी महिला बाल कल्याण समिती व राहुरी नगरपालिकेच्या वतीने साजरा होणाऱ्या राजमाता जिजाऊ महिला दिनाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन समितीच्या सदस्या लताबाई जगधने,संगीता जाधव,वृषाली तनपुरे,सिंधुताई डावखर,प्रियांका काशीद,आस्मा शेख,प्रसन्न वराळे मनीषा भोंगळ, मनीषा बर्डे तसेच नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे सर उपनगराध्यक्ष गजानन सातभाई व सर्व नगरसेवक मुख्याधिकारी यांनी केले.सर्व कार्यक्रम सौ भागीरथीबाई तनपुरे कन्या माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे होतील.

# शेतकरी, महिलांनी एल्गार

**राजूर : (समर्थ गांवकरी)**

अकोले तहसील कार्यालय येथे आंबेवंगण ,लाडगाव , मान्हेरे येथील शेतकऱ्यांनी, महिलांनी एल्गार संघटनेच्या नेतृत्वाखाली हंडा मोर्चा काढण्यात आला होता. सामाजिक कार्यकर्ते मधे या संघटनेचे अध्यक्ष यांच्या नेतृत्वामध्ये हा हंडा मोर्चा काढण्यात आला होता. या आंदोलनाला के ए ग्रुप संघटनेच्या वतीने प्रत्यक्ष सहभागी होऊन पाठिंबा देण्यात आला .. तहसीलदार ,पाणीपुरवठा अभियंता गटविकास अधिकारी, पंचायत समिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांच्या सर्व उपस्थितीमध्ये मागण्या ठेवण्यात आल्या आणि प्रशासनाला खडे बोल सुनावले. भारत स्वतंत्र झाला, संपूर्ण जिल्ह्याला पाणी पाजणारा अकोले तालुका, आणि या अकोले तालुक्यातील शेतकऱ्यांना, ग्रामस्थांना पिण्यासाठी पाणी नाही, याच्यापेक्षा दुर्दैव काय म्हणायचं..

# देवच भव पाशातून तारील - डॉ. नारायण महाराज जाधव

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**



श्री संत तुकाराम महाराज बिजोत्सवा निमित्त पारनेर तालुक्यातील वडझिरे येथील अखंड हरीनाम साप्ताहास 50 वर्ष पूर्ण झाल्यामुळे, सुवर्ण महोत्सवी अखंड हरीनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. भव्य कीर्तन सोहळ्यातील तिसऱ्या दिवसाचे कीर्तनपुष्प हभप डॉ. नारायणमहाराज जाधव आळंदी यांनी गुंफले.

यावेळी हभप डॉ. नारायणमहाराज जाधव यांनी " आलिया भोगासी असावे सादर, देवावरी भार घालुनिया " या संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर सविस्तर निरूपण केलें.

यावेळी बोलताना महाराज म्हणाले,जो भोग आपल्याला पूर्व कर्मा मुळे आलेला आहें त्याचा आदर माणसाला करावाचं लागेल. दुःखाचे निवारण व्हावे म्हणून हा सगळा भार देवावर घालवा. देव आपले रक्षण करत असतो. भगवंताला शरण जा,परमात्मा कर्मानुसार फळं देईल.आयुष्यात चांगले वाईट प्रसंग येतं असतात. त्यांना घाबरून न जाता शांतपणे त्याचा स्वीकार करा. आणि त्याचा भार देवावर टाका आणि निश्चिन्त व्हां.आपण कर्ता नाही कर्ता करविता देव आहें याचं भान ठेवा. आपण मनोभावे देवाला शरण जातो तेव्हा तेव्हा देवच आपल्या संकटांचे निवारण करतो.संकटाना घाबरून जाऊ नका. भगवंताचे नाते केलें तरच भगवंत आपल्याला भेटायला येतो.देवाचे नामस्मरण करा देवच या भव पाशातून आपल्याला वाचवेल. परिस्थितीला सामोरे जाऊन देवावर विश्वास ठेवा यातून दुःख तर दूर होईल शिवाय आपल्याला आनंदसुद्धा मिळतो.

कीर्तन श्रवणासाठी मोठ्या संख्येने भाविकभक्त उपस्थित होते.

# पोदार प्रेप संगमनेर येथे विमानतळाची सफर आणि चिमुकल्यांचा आनंद! 'हवाई वाहतूक' विषयावर विशेष शैक्षणिक सहल संपन्न

## पोदार प्रेप संगमनेरमध्ये नुकताच 'हवाई वाहतूक' उपक्रम उत्साहात संपन्न झाला

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर येथील नामांकित पोदार प्रेप शाळेतील पूर्व-प्राथमिक विभागाच्या चिमुकल्यांनी नुकताच 'हवाई वाहतूक' (Air Transport) या संकल्पनेवर आधारित एक विशेष 'थीमॅटिक टूर' आणि 'रोल प्ले' उपक्रम अनुभवला. या नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना हवाई प्रवासाची प्रक्रिया आणि विमानतळावरील विविध कर्मचाऱ्यांच्या जबाबदाऱ्यांची प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. ज्यामध्ये पोदार प्रेपच्या शिक्षिकांनी हवाई अड्डयाचा अप्रतिम असा देखावा तयार केला होता. हा देखावा बघताना आणि त्याचा अनुभव घेताना या चिमुकल्यांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता. साधनांची ओळख करून देणे हा या सहलीचा मुख्य हेतू होता. जमिनीवरून चालणारी वाहने मुले नेहमीच पाहतात, मात्र हवेतून प्रवास करणाऱ्या वाहनांचे कुतूहल त्यांच्या मनात नेहमीच असते. हेच कुतूहल शमवण्यासाठी आणि त्यांना विमानाची रचना, विमानतळावरील कार्यपद्धती आणि सुरक्षा नियमांची प्राथमिक माहिती देण्यासाठी या सहलीचे आयोजन केले गेले.

उपक्रमाची वैशिष्ट्ये:

शाळेच्या परिसरातच एका 'मिनी एअरपोर्ट'चे स्वरूप निर्माण करण्यात आले होते. पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देण्यासाठी आयोजित या उपक्रमात चिमुकल्यांनी विविध भूमिका अत्यंत उत्साहाने साकारल्या.

वैमानिक आणि केबिन क्रू: काही विद्यार्थ्यांनी युनिफॉर्म घालून वैमानिक आणि एअर होस्टेसच्या भूमिका साकारल्या, ज्यामुळे त्यांना विमानातील शिस्त आणि जबाबदारीची ओळख झाली.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विमानतळावर लागणारे 'बोर्डिंग पास', तिकीट आणि सामानाची



तपासणी कशी होते, याबद्दल सोप्या भाषेत माहिती दिली व त्यांचे सादरीकरणही केले.

विमानतळावर होणारी सुरक्षा तपासणी (Security Check) आणि सामानाचे व्यवस्थापन कसे केले जाते, याचे प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांनी करून दाखवले.

इतर विद्यार्थ्यांनी हातात 'बोर्डिंग पास' आणि 'तिकीट' घेऊन विमानतळावरील चेक-इन प्रक्रियेचा अनुभव घेतला.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश शिक्षणातून आनंद व मुलांच्या 'होलिस्टिक डेव्हलपमेंट' वर भर देणे हा होता. पोदार प्रेपच्या 'किड्यकेशन' (KIDUCATION) तत्त्वानुसार, मुलांना खेळातून आणि अनुभवातून शिकवल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास आणि संवाद कौशल्ये वाढण्यास मदत होते. विमानाची उड्डाण करण्याची पद्धत आणि हवाई वाहतुकीचे महत्त्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितले.

पोदार इंटरनॅशनल स्कूल संगमनेरच्या प्राचार्या सौ. मीनाक्षी मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. अशा उपक्रमांमुळे मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो आणि त्यांना जगातील विविध क्षेत्रांची प्राथमिक ओळख होते असे मत त्यांनी व्यक्त केले.

पोदार प्रेपच्या मुख्याध्यापिका सौ. सोनल शुक्ला यांनी सांगितले की, "मुलांना केवळ वर्गात शिकवण्यापेक्षा अशी प्रात्यक्षिके दिल्याने त्यांचा सर्वांगीण विकास होतो. विमानासारखी भव्य गोष्ट अनुभवल्यामुळे त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो".

या उपक्रमात शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि चिमुकल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

मुलांच्या एका अविस्मरणीय अनुभवासह या सहलीची सांगता झाली.

विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या या अनोख्या उपक्रमासाठी पालकांकडूनही कौतुकाचा वर्षाव झाला.

# २८ फेब्रुवारी रोजी वाशिम येथे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन

## पुरस्कार, सन्मान व चर्चासत्रांचा समावेश

**मुंबईप्रतिनिधी/वाशिम : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई व महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. २८ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता वाशिम येथील वैकुंठधामवासी मातोश्री सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी परिसर, वाटाणे लॉन येथे २७ वे राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशन, पुरस्कार वितरण व पदाधिकारी सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वास आरोटे यांनी दिली.

स्थानिक वाटाणे लॉन येथे होणाऱ्या राज्यस्तरीय पत्रकार संमेलनाचे उद्‌घाटन केंद्रीय आयुष मंत्री ना. प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे. सहउद्‌घाटक म्हणून महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित राहतील, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालकमंत्री ना. दत्तात्रय भरणे राहणार आहेत. विशेष आशीर्वाद उपस्थिती म्हणून अयोध्या मंदिराचे कोषाध्यक्ष गोविंद गिरी महाराज यांचे बंधू भागवताचार्य प.पू. रमाकांत व्यास उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमास महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे अध्यक्ष राजू भांदुर्गे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, राज्य संघटक संजय भोकरे, डिजिटल मीडिया अध्यक्ष सिद्धार्थ भोकरे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव, प्रदेश उपाध्यक्ष महेश पानशे, किशोर रायसाकडा, अशोक देडे, डॉ. अभय कुमार दांडगे, संपर्क प्रमुख वैभव स्वामी, कोकण विभागीय अध्यक्ष शैलेश पालकर, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अनिल रहाणे, विदर्भ प्रमुख नयन मोंढे, पश्चिम महाराष्ट्र विभागीय अध्यक्ष राजेंद्र कोरटे, नागपूर विदर्भ प्रमुख अनुपम कुमार भार्गव यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

तसेच विशेष अतिथी म्हणून सहकार मंत्री ना. आकाश फुंडकर, कॅबिनेट मंत्री ना. संजय राठोड, विभागीय अध्यक्ष सुनिल फुलारी, चर्मकार समाज जिल्हाध्यक्ष दिपक ढोके उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

**उत्कृष्ट संघटक युवा चेतना पुरस्कार जाहीर** : महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने यंदाचे उत्कृष्ट संघटक युवा चेतना पुरस्कार २०२५–२६ जाहीर करण्यात आले आहेत. त्यामध्ये पुढील पदाधिकाऱ्यांचा समावेश आहे :

- श्री. किशोर रायसाकडा (प्रदेश उपाध्यक्ष, पाचोरा – जळगाव) – उत्तर महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक
- श्री. नयन मोंढे (अमरावती) – विदर्भ अध्यक्ष, उत्कृष्ट संघटक
- श्री. राकेश खराडे (रायगड जिल्हाध्यक्ष) – कोकण विभाग उत्कृष्ट संघटक
- श्री. शंकर बोरघरे (चंद्रपूर–गडचिरोली जिल्हाध्यक्ष) – उत्कृष्ट संघटक
- श्री. अनुपम कुमार भार्गव (वर्धा) – नागपूर विदर्भ उत्कृष्ट संघटक
- श्री. वैभव स्वामी (प्रदेश संपर्कप्रमुख, बीड) – मराठवाडा उत्कृष्ट संघटक
- गणेश देवगावकर (जिल्हाध्यक्ष, सोशल मीडिया – वाशिम) – उत्कृष्ट संघटक
- नागेश आदापुरे (पंढरपूर) – पश्चिम महाराष्ट्र उत्कृष्ट संघटक
- मा. दशरथ चव्हाण (जिल्हाध्यक्ष, नवी मुंबई) – उत्कृष्ट संघटक
- मा. पोपटराव गवांदे (इगतपुरी, नाशिक जिल्हा) – उत्कृष्ट संघटक

या सर्व मान्यवरांना अधिवेशनात सन्मानित करण्यात येणार आहे.

**चर्चासत्रे व प्रबोधन सत्रांचे आयोजन :** दुपारी २ ते ३ या वेळेत "पत्रकारांचा डीएनए काय? व अजितदादा पवार यांच्या मृत्यूचे राजकारण होत आहे का?" या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे. यामध्ये राज्य संघटक सिद्धार्थ भोकरे, ज्येष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे, प्रदेश अध्यक्ष गोविंद वाकोडे आणि प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे सहभागी होणार आहेत. चर्चासत्राचे संचालन प्रदेश कार्याध्यक्ष निलेश सोमाणी करतील.

दुपारी ३ ते ४ दरम्यान पदाधिकारी सन्मान सोहळा पार पडणार असून ४ ते ५ या वेळेत द्वितीय प्रबोधन सत्र आयोजित करण्यात आले आहे. या सत्रात ज्येष्ठ संपादक डॉ. राजेश राजोरे "सायबर युगातील माध्यमे आणि मूल्यनिष्ठ पत्रकारिता" या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत.

प्रबोधन सत्राचे उद्‌घाटन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे संघटक संजय भोकरे यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी अ‍ॅड. सौ. भारती सोमाणी, प्रमुख अतिथी सौ. वृषाली टेकाळे राहतील. "संत विचारातून अभिव्यक्ती स्वातंत्र्य" या विषयावर प्रचार प्रमुख गोपाल कडू मार्गदर्शन करणार आहेत.

सभाध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज वाघ, उद्‌घाटक दामोदर पाटील गुरजी आणि विशेष अतिथी बाबाराव पाटील उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमात सहकार्य करणाऱ्या मान्यवरांचा विशेष सन्मान करण्यात येणार आहे. अधिवेशनास मोठ्या संख्येने पत्रकार बांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन निमंत्रक आ. शाम खोडे, राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, निलेश सोमाणी, स्वागताध्यक्ष गिरधारीलाल सारडा, मुख्य समन्वयक डॉ. हरिष बाहेती, सहस्वागताध्यक्ष देवेंद्र खडसे पाटील, कार्याध्यक्ष शिवाजीराव वाटाणे, अ‍ॅड. भारती सोमाणी, विदर्भ अध्यक्ष नयन मोंढे, कार्याध्यक्ष अभय खेडकर, विभाग अध्यक्ष सुनिल फुलारी, जिल्हाध्यक्ष किरण क्षार, शहर जिल्हाध्यक्ष पप्पु घुगे, इलेक्ट्रॉनिक मीडिया जिल्हाध्यक्ष राम धनगर, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष गणेश देवगावकर, डिजिटल मीडिया जिल्हाध्यक्ष कैलास महाजन यांसह अनेक पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

याशिवाय विदर्भ समन्वयक मोहित कर्नावट, उपाध्यक्ष संजय कडोळे, प्रदेश सदस्य पंकज सोनोने, रवि अंभोरे, नारायण आरू, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती जिल्हाध्यक्ष प्रफुल बानगावकर, जिल्हा उपाध्यक्ष समीर देशपांडे, अमोल अघम, संतोष गुल्हाणे, राजकुमार ठाकूर, संजय राठी, शाम अपूर्वा, बंडू राठोड, शिवाजी खडसे, अ‍ॅड. सुरेश टेकाळे, सौ. वृषाली टेकाळे, गोरखनाथ भागवत, विजय घोंगडे आदींची उपस्थिती राहणार आहे.

कार्यक्रमस्थळी प्रवेशद्वाराला विदर्भ केसरी स्व. ब्रजलाल बियाणी यांचे नाव देण्यात आले असून परिसराला वैकुंठधामवासी सौ. स्नेहलता पुनमचंद सोमाणी यांचे नाव देण्यात आले आहे. या राज्यस्तरीय अधिवेशनाद्वारे पत्रकार संघटनात्मक बळकटी, पत्रकारांच्या समस्या, बदलते माध्यमविश्व आणि मूल्यनिष्ठ पत्रकारितेवर व्यापक चर्चा होणार असल्याने राज्यभरातील पत्रकारांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

# प्रशासनाशी झालेल्या यशस्वी चर्चेनंतर लाँग मार्च स्थगित

## पालकमंत्री विखे पाटील यांच्या यशस्वी मध्यस्थीने शेतकरी-कामगारांच्या मागण्या मान्य

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

अखिल भारतीय किसान सभा व सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी, कामगार आणि आदिवासींच्या उर्वरित प्रश्नांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर मार्ग निघाला असून, आंदोलकांच्या सर्व मागण्या मान्य झाल्या आहेत. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या यशस्वी मध्यस्थीमुळे राजूर ते अहिल्यानगर निघालेला लाँग मार्च निझर्णेश्वर येथे स्थगित करण्यात आला आहे.



अकोले तालुक्यातील राजूर येथून अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर हा लाँग मार्च काढण्यात येत होता. या मोर्चामध्ये आदिवासी शेतकरी, कामगार, पोषण आहार तयार करणाऱ्या मदतनीस, वैद्यकीय क्षेत्रातील अर्धवेळ परिचर आपल्या मागण्यांसाठी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संगमनेर येथून निघालेला लाँग मार्च काल सायंकाळी निझर्णेश्वर येथे पोहोचला होता. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाच्या माध्यमातून आंदोलकांशी सातत्याने संपर्क साधून मागण्यांबाबत तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते.

दोन दिवसांपूर्वी मंत्रालयात मंत्री विखे पाटील यांनी पुढाकार घेऊन आंदोलक व विविध विभागांचे मंत्री यांच्यात यशस्वी संवाद घडवून आणला होता. या बैठकीमध्ये आंदोलकांच्या बहुतांश मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या. मात्र, शालेय शिक्षण व कामगार विभागाशी संबंधित असलेल्या मागण्या मान्य होत नसल्यामुळे आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम होते. निझर्णेश्वर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, प्रांताधिकारी अरुण उंडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि इतर विभागांच्या अधिकाऱ्यांनी आंदोलकांशी संवाद साधला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेनंतर उर्वरित मागण्याही सरकारने मान्य केल्या असल्याचे सांगितले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्याची प्रशासनाची विनंती आंदोलकांनी मान्य केली.

अर्धवेळ परिचारकांच्या मानधनात सरकारने वाढ करण्याचा निर्णय घेतला असून, शालेय पोषण आहार मदतनिसांचे मानधनही वाढविण्यास सरकारने हिरवा कंदील दिला आहे. भंडारदरा धरणाचे हक्काचे पाणी आदिवासी भागाला मिळावे म्हणून, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्वेक्षणाला दिलेल्या आदेशाचे आंदोलनकर्त्यांनी स्वागत केले आहे. बांधकाम कामगारांना आता आरोग्य विमा योजनेतून सर्व सुविधा मिळण्याचा मार्ग सरकारच्या निर्णयामुळे सुकर झाला आहे.

आंदोलकांच्या मागण्यांबाबत सरकारची भूमिका सकारात्मक राहिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व मागण्यांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन आंदोलकांना दिलासा दिला. या निर्णयाबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले, तसेच आंदोलकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार व्यक्त केले आहेत.

# बचत व व्यवस्थापन-एकदिवसीय कार्यशाळा संपन्न

**जुन्नर तालुका: (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे,विद्यार्थी विकास मंडळ व समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ कॉलेज ऑफ इंजिनियरिंग अँड मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने "Energy Audit and Management" या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन समर्थ शैक्षणिक संकुल बेल्हे येथे नुकतेच करण्यात आले होते कार्यक्रमावेळी प्राचार्य डॉ.नवनाथ नरवडे यांच्या हस्ते प्रा. दसपुते यांचा सन्मान करण्यात आला.या कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शक प्रा.प्रमोदजी दसपुते यांनी ऊर्जेचे ऑडिट कसे करावे,त्याचे शास्त्रशुद्ध नियोजन कसे आखावे तसेच ऊर्जा संसाधनांचे प्रभावी व कार्यक्षम व्यवस्थापन कसे साध्य करता येईल तसेच ऊर्जा बचत, खर्च नियंत्रण, कार्यक्षमता वाढ आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने ऊर्जा ऑडिटचे महत्त्व त्यांनी उदाहरणांसह




स्पष्ट केले.या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना ऊर्जा व्यवस्थापनाच्या व्यावहारिक बाबी समजून घेण्यास मोठी मदत झाली.इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकल व इलेक्ट्रिकल विभागातील विद्यार्थ्यांचा या उपक्रमाला मोठा प्रतिसाद लाभला.ऊर्जा बचत, कार्यक्षमता वाढ आणि शाश्वत विकासाच्या दृष्टीने हीकार्यशाळा विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरली.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंत शेळके,उपाध्यक्ष माऊली शेळके,सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहल शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदिप गाडेकर मेकॅनिकल विभागाचे प्रमुख प्रा.अमोल खतोडे,डॉ.संदीप नेहे,प्रा.कौस्तुभ मेहर,प्रा.अमोल भोर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा.निलेश नागरे यांनी केले तर आभार डॉ.शरद पारखे यांनी मानले.

# घुगलवडगाव जि.प. प्रा. शाळेत पालक मेळावा



**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील घुगलवडगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पालक मेळावा उत्साहात पार पडला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी दिपक दांगडे यांची निवड करण्यात आली. त्यांच्या नावाचा प्रस्ताव मुख्याध्यापक मगर सर यांनी मांडला, तर भरत पवार यांनी त्यास अनुमोदन दिले.

यावेळी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. त्यानुसार घुगलवडगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा माजी विद्यार्थी संघाच्या अध्यक्षपदी रोहीदास दांगडे, तर उपाध्यक्षपदी महेश पवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे उपस्थितांनी अभिनंदन केले.

तसेच दै. नगर सह्याद्रीचे पत्रकार आप्पासाहेब नामदेव चव्हाण, रवींद्र भिमराव गलांडे, शिवाजी शांताराम दांगडे, सुरज गौतम ससाणे, भागवत विलास पाचपुते, शहाजी कोंडीबा दांगडे, तुषार बाळासाहेब पवार, विलास बबन कदम, गौतम सुरेश दांगडे, सागर सुभाष दांगडे, सतीश किसन दांगडे व अंकुश सर्जेराव गलांडे यांची सदस्य म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली.

या कार्यक्रमास शालेय समिती अध्यक्ष दिपक दांगडे, उपाध्यक्ष भरत पवार, व्हाइस चेअरमन रामदास दशरथ दांगडे, देऊळगाव शालेय समिती अध्यक्ष अनिल दांगडे, विठ्ठल दांगडे, सचिन पवार, बाळासाहेब दांगडे, मधुकर दांगडे, राहुल कैलास दांगडे, अनिल गलांडे आदी मान्यवर उपस्थित होते.

शाळेच्या प्रगतीसाठी माजी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# मराठी भाषा दिन उत्साहात साजरा

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

ज्येष्ठ कवी, साहित्यिक व ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांच्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या मराठी भाषा दिनाचे औचित्य साधून टेंभी नाका शाळा क्र. 7, इंग्रजी माध्यम (बालवाडी विभाग) यांच्या वतीने आज दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात संत साहित्याच्या स्मरणाने करण्यात आली. पालखीत संत ज्ञानेश्वर यांची आकर्षक व सुशोभित प्रतिमा ठेवण्यात आली होती. फुलांची सजावट, पारंपरिक रांगोळी आणि ढोल-ताशांच्या गजरात दिंडीला प्रारंभ झाला. बालवाडीतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा परिधान करून मराठी संस्कृतीची झलक सादर केली. मुलांनी "मराठी असे आमची मायबोली", "जय जय महाराष्ट्र माझा" अशा घोषणांनी परिसर दुमदुमून टाकला.

# स्काऊटमुळे प्रगल्भ व्यक्तिमत्त्व घडते – शिक्षणाधिकारी

- स्काऊट म्हणजे बिनभिंतीची शाळा – तहसीलदार सचिन डोंगरे
- हिरडगावात त्रिदिवसीय स्काऊट 'निसर्ग निवास' शिबिर उत्साहात संपन्न

**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

रयत शिक्षण संस्थेच्या श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयाच्या स्काऊट पथकाने हिरडगाव (ता. श्रीगोंदा) येथे आयोजित केलेले त्रिदिवसीय 'निसर्ग निवास' शिबिर उत्साहात संपन्न झाले. शिबिराच्या महाशेकोटी कार्यक्रमात बोलताना जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या शिक्षणाधिकारी सौ. संध्या गायकवाड यांनी, "स्काऊट चळवळीमुळे विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व प्रगल्भ बनते. सुजाण व




जबाबदार नागरिक घडविण्याची ताकद स्काऊटमध्ये आहे," असे प्रतिपादन केले. भारत स्काऊट आणि गाईड, अहिल्यानगर जिल्हा तसेच समस्त ग्रामस्थ हिरडगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा येथील अनिल भाऊराव पाटील पथकाचे तृतीय निसर्गनिवास स्काऊट-गाईड शिबिर दि. २४ ते २६ फेब्रुवारी २०२६ दरम्यान जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, हिरडगावच्या मैदानावर पार पडले. या शिबिरात श्रीमंत राजमाता कन्या विद्यालय, श्रीगोंदा तसेच न्यू इंग्लिश स्कूल, मढेवडगाव येथील स्काऊट-गाईड पथकांनी सहभाग नोंदविला. शिबिराचे उद्घाटन माजी मंत्री बबनराव पाचपुते यांच्या हस्ते झाले. यावेळी रयत शिक्षण संस्था उत्तर विभागाचे विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, श्रीगोंदा नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सुनीता खेतमाळीस, उपनगराध्यक्षा अलका अनभूले, एम. जे. एस. कॉलेजचे प्राचार्य प्रकाश साळवे, सरपंच रामदास बनकर, उपसरपंच अमोल दरेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

पहिल्या दिवशी 'बिनभांड्यांचा स्वयंपाक' स्पर्धा उत्साहात पार पडली. दुसऱ्या दिवशी प्रभातफेरी व शोभायात्रेद्वारे विविध भारतीय संस्कृतींचे आकर्षक सादरीकरण करण्यात आले. श्रमदान उपक्रमांतर्गत गाव स्वच्छता अभियान राबवून विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली. महाशेकोटी कार्यक्रमासाठी शिक्षणाधिकारी संध्या गायकवाड, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य बाबासाहेब भोसले उपस्थित होते.

# यात्रा उत्सवात महिला बचत गटांचे खाद्यपदार्थ स्टॉल सुरू




**श्रीगोंदा : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा येथील श्री संत शेख महंमद महाराज यांच्या यात्रा उत्सवानिमित्त वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी आणि चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्था, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बचत गटांच्या माध्यमातून खाद्यपदार्थ विक्री स्टॉल सुरू करण्यात आले आहेत. महिला सक्षमीकरणाच्या उद्देशाने महिला उद्योजकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे तसेच इतर महिलांना उद्योजकतेसाठी प्रेरणा मिळावी, हा या उपक्रमामागील मुख्य हेतू असल्याचे सौ. मेघना गावडे यांनी सांगितले. यात्रेत सहभागी होणाऱ्या भाविकांनी विविध दुकानांना भेटी देताना महिला बचत गटांनी तयार केलेल्या खाद्यपदार्थांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

सौ. गावडे म्हणाल्या की, वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटी आणि चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्था ग्रामीण भागातील महिला बचत गटांना सातत्याने कर्जपुरवठा करून गृहउद्योगांना चालना देत आहेत. यात्रा काळात लाखो भाविक येत असल्याने खाद्यपदार्थांच्या दुकानांची मोठी आर्थिक उलाढाल होते. अशा वेळी महिला बचत गटांच्या स्टॉलला मिळणारा प्रतिसाद हा महिला उद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरेल. या स्टॉलचे उद्घाटन वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटीचे संस्थापक विठ्ठलराव वाडगे आणि चैतन्य महिला बचत गटांची सहकारी पतसंस्थेच्या चेअरमन सौ. रुक्मिणी वाडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यात्रेत पाणीपुरी, पावभाजीसह विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल सुरू करण्यात आले आहेत. वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट सोसायटीच्या चेअरमन सौ. सायली वाडगे यांनी सांगितले की, विठ्ठलराव वाडगे यांनी महिला सक्षमीकरणाच्या माध्यमातून हजारो बचत गटांना गृहउद्योग सुरू करण्यासाठी प्रोत्साहन दिले आहे. अनेक गृहउद्योग उभे राहिले असून त्यांना आर्थिक चालना मिळावी या उद्देशाने यात्रेनिमित्त स्टॉल सुरू करण्याची संकल्पना राबविण्यात आली. ग्राहकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यास भविष्यात ठिकठिकाणी अशा प्रकारचे स्टॉल सुरू करण्याचा मानस असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी स्टॉलधारक तसेच भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हे स्टॉल २६ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान सुरू राहणार असून नागरिकांनी त्यास प्रतिसाद द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सीएमई कार्यक्रमाचे आयोजन

**ठाणे: (समर्थ गांवकरी)**

ठाणे डॉक्टर्स फोरमच्या सहकार्याने बोर्नियो मदर अँड चाइल्ड केअर हॉस्पिटलने ठाण्यातील डॉक्टरांसाठी सीएमई कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमाला डॉ. मनाली (शाखा प्रमुख) आणि उमेश कांबळे (मार्केटिंग प्रमुख) उपस्थित होते. या शैक्षणिक सत्रात डॉ. वृषाली पिल्लई, वरिष्ठ प्रसूती आणि स्त्रीरोगतज्ज्ञ, • डॉ. विवेक भोरटक्के, बालरोगतज्ज्ञ आणि नवजात शिशुतज्ज्ञ, तसेच डॉ. हेमंत चौधरी, रोबोटिक जॉइंट रिप्लेसमेंट सर्जन यांची व्याखान झाली. वक्त्यांनी त्यांच्या संबंधित वैशिष्ट्यांमधील आधुनिक तंत्रज्ञान प्रगती व वैद्यकीय उपचार याबद्दल उपस्थित डॉक्टरांना माहिती दिली. सत्राचा समारोप एका संवादात्मक प्रश्नोत्तर फेरीने झाला, जिथे सहभागी डॉक्टरांनी सक्रियपणे चर्चेत भाग घेतला.

# एनएमएमएस परीक्षेत कन्या विद्यालय अव्वल



**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

नुकत्याच जाहीर झालेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (एनएमएमएस) या केंद्रशासित परीक्षेत श्रीगोंदा येथील श्रीमंत राजमाता विजयाराजे शिंदे कन्या विद्यालयाने गुणवत्तेचा दबदबा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेसाठी विद्यालयातील १४० विद्यार्थिनी प्रविष्ट झाल्या होत्या. त्यापैकी तब्बल ५० विद्यार्थिनींनी १०० पेक्षा अधिक गुण मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. कु. मयुरी लहू गांगर्डे हिने १५६ गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला.

या शिष्यवृत्ती अंतर्गत पात्र विद्यार्थिनींना प्रति वर्ष १२ हजार रुपये प्रमाणे चार वर्षे आर्थिक सहाय्य दिले जाते. यशस्वी विद्यार्थिनींना विभागप्रमुख श्री. मिलिंद काळे तसेच विषय शिक्षक श्री. कुंदन खामकर, श्रीम. सोनाली कळसकर आणि श्री. ज्ञानदेव पोळ यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. वर्षा भोईटे, पर्यवेक्षक श्री. बाळासाहेब शिंदे आणि गुरुकुल प्रमुख श्री. किरण शिंदे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन केले. गुणवंत विद्यार्थिनींचे परिसरातून कौतुक होत असून, एनएमएमएस परीक्षेत गेल्या अनेक वर्षांपासून रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभागात अग्रस्थानी असलेले हे विद्यालय यंदाही आपले अव्वल स्थान कायम राखण्यात यशस्वी ठरले आहे.

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/६०/२०२४ अकोले दि.२१/०८/२०२४

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्री. काशिनाथ महादु आव्हाड, रा. समशेरपुर**, ता. अकोले जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये अर्जदार **अर्जदार यांची आई सिताबाई महादु आव्हाड यांचा जन्म दि. १०/०९/१९९७ रोजी समशेरपुर** येथे झाला असल्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालय **समशेरपुर**, ता. अकोले यांचे जन्म-मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे. तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्री. काशिनाथ महादु आव्हाड, रा. समशेरपुर**, ता.अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांची आई सिताबाई महादु आव्हाड यांचा जन्म दि. १०/०९/१९९७ रोजी समशेरपुर** येथे झाला आहे. सदर जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय **समशेरपुर**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर येथे जन्माची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. तहसिल कार्यालयासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर जन्माची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. तहसिलदार साहेबांसमोर पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. २१/०८/२०२४ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

**कामगिरी क्लर्क**

**हुकूमावरुन,
तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले**

# छत्रपती महाविद्यालयास ३ राज्यस्तरीय पुरस्कार

## उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत वितरण

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या वतीने सन २०२५-२६ साठी राबविण्यात येणाऱ्या 'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाला तीन राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले. हे पुरस्कार मुंबई व पुणे येथे आयोजित समारंभांत वितरित करण्यात आले.

दिनांक २५ फेब्रुवारी २०२६ रोजी मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्रातील विशेष कामगिरीबद्दल डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या उपस्थितीत खादी व ग्रामोद्योग राज्यमंत्री रवींद्र साठे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

तसेच २६ फेब्रुवारी २०२६ रोजी पुणे येथील हरिभाई देसाई कॉलेजमध्ये अतिरिक्त जिल्हाधिकारी राजीव नंदकर यांच्या हस्ते उत्कृष्ट महाविद्यालयीन समन्वयक म्हणून डॉ. विलास सुद्रिक यांना सन्मानित करण्यात आले. याच वेळी छत्रपती महाविद्यालयाला 'उत्कृष्ट महाविद्यालयीन विद्यार्थी करिअर संसद' हा पुरस्कारही प्रदान करण्यात आला.

या समारंभांना समन्वयक डॉ. विजय इथापे, शारीरिक शिक्षण



संचालक डॉ. सतीश चोरमले आणि प्रा. वैभव सोनवणे उपस्थित होते.

स्व. शिवाजीराव नागवडे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे या उद्देशाने १९८२ साली महाविद्यालयाची स्थापना केली. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी संस्थेच्या गुणात्मक प्रगतीसाठी अथक परिश्रम घेतले. अवघ्या ९९ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या महाविद्यालयात आज सुमारे ४ हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. १६ एकर परिसरात भौतिक सुविधांनी सुसज्ज असे हे महाविद्यालय संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र (दादा) नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने प्रगतीपथावर आहे. 'नॅक'मध्ये मिळालेले 'ए प्लस' मानांकन आणि पुरस्कारांची हॅट्रिक हे त्याचेच द्योतक आहे.

अध्यक्ष राजेंद्र (दादा) नागवडे यांनी शुभेच्छा देताना प्राध्यापक व विद्यार्थी कष्टातून उत्कृष्ट प्रावीण्य मिळवत असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक विकासालाही प्राधान्य दिले जात असल्याने उच्च निकाल आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यामुळे महाविद्यालय नावारूपाला आल्याची प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली.

प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी यांच्या व्यवस्थापन व सहकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली २०२५ या वर्षात २० विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात निवड झाली, तर कॅम्पस मुलाखतीद्वारे ५० विद्यार्थ्यांना विविध उद्योगसंस्थांमध्ये नोकरीची संधी मिळाली. पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्रातूनही अनेक विद्यार्थी

> महाविद्यालयाचा आलेख दिवसेंदिवस उंचावत आहे. सर्व अध्यापक व अध्यापकेतर सेवकांनी असेच झोकून देऊन काम करावे; संस्था खंबीरपणे सर्वांच्या पाठीशी असेल.
>
> **— राजेंद्र (दादा) नागवडे, अध्यक्ष**

यश संपादन करत आहेत. दरवर्षी कॅम्पस मुलाखतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना महाविद्यालयातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात असल्याचे प्राचार्यांनी सांगितले. करिअर संसद टीमने 'करिअर कट्टा'तील वर्षभरातील सर्व उपक्रमांत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

"बापूंनी बिकट परिस्थितीत संस्थेच्या गुणात्मक प्रगतीसाठी जीवाचे रान केले. त्यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी अध्यक्ष राजेंद्र (दादा) नागवडे व विश्वस्तांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही सर्वजण प्रयत्नशील आहोत," अशी भावना प्राचार्यांनी व्यक्त केली.






# सँडोज या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये समर्थ फार्मसीच्या विद्यार्थ्यांची निवड

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी, बेल्हे या औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयाच्या ट्रेनिंग आणि प्लेसमेंट सेल च्या वतीने नुकतेच पूल कॅम्पस ड्राइव्ह २०२६ चे आयोजन करण्यात आले होते.

या कॅम्पस ड्राईव्ह मध्ये फार्मसी च्या अंतिम वर्षातील २६ विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग दर्शविला. मुलाखतीमध्ये समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी तसेच परिसरातील औषध निर्माण शास्त्रमहाविद्यालयातील २६ विद्यार्थ्यांची प्रथम फेरीमध्ये लेखी परीक्षेद्वारे निवड करण्यात आली. त्यानंतर वैयक्तिक मुलाखतीच्या फेऱ्या यशस्वीपणे पार केल्या.यामध्ये महाविद्याल यातील ४ विद्यार्थ्यांची निवड झाल्याची माहिती समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके व समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.संतोष घुले यांनी दिली. सँडोज कंपनीचे एच आर समीर चव्हाण व प्रॉडक्शन हेड प्रदिप गाडे यांनी मुलाखतीची सर्व निवड प्रक्रिया पूर्ण केली.

ऑपरेटर व सुपरवायझर या पदांसाठी सदर मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. निवड झालेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे:- समर्थ फार्मसी मधील यश हादगे-सुपरवायझर, महेश पुजारी व सिद्धेश नऱ्हे-ऑपरेटिव्ह सुपरवायझर ,राहुल राऊत-ऑपरेटर या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

ट्रेनिंग व प्लेसमेंट अधिकारी डॉ.बिपीन गांधी,डॉ.सागर तांबे,प्रा. सचिन पोखरकर यांनी कॅम्पस ड्राईव्ह चे यशस्वी नियोजन करण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्या स्नेहलताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत,समर्थ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.कुलदीप रामटेके,समर्थ कॉलेज ऑफ फार्मसी चे प्राचार्य डॉ.संतोष घुले,विभागप्रमुख डॉ.नितीन महाले,प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदिप गाडेकर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## महिलांसाठी विशेष पर्वणी

# भन्नाट स्पर्धांचे केलंय आयोजन !

**राहुरी : (समर्थ गांवकरी)**

८ मार्च जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने राहुरी नगरपालिका व महिला बाल कल्याण समितीच्या वतीने राजमाता जिजाऊ जागतिक महिला दिनाचे आयोजन करण्यात आले आहे .

महिला दिनाचा कार्यक्रम माजी नगराध्यक्षा डॉ सौ उषाताई तनपुरे व ओजस्विनी पतसंस्थेच्या संस्थापक चेअरमन सौ सुजाता तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली यावेळी आयोजित करण्यात आला असून प्रथमच महिलांसाठी मॅरेथॉन स्पर्धा, क्रिकेट स्पर्धेसह विविध डान्स, रील कॉम्पिटेशन आदि स्पर्धेचे तसेच बचत गटाच्या स्टॉल ही उभारण्यात येणार आहे .

जागतिक महिला दिनाचा सलग सहा दिवस कार्यक्रम पुढीलप्रमाणे दि ६ मार्च शुक्रवार रोजी पतंजली योगा ग्रुपच्या वतीने ॐ कार भगवत गीता १२ वा अध्याय दुपारी ४ वाजता, महिलांचे शारीरिक व मानसिक आरोग्य याविषयी व्याख्यान डॉ ज्योती महेश कोहकडे, डान्स कॉम्पिटेशन सोलो व ग्रुप डान्स,रील स्पर्धा यासाठी नाव नोंदणी अनुपमा सातभाई व अनिता गडढे यांचेकडे करावी, शनिवार दि, ७ सकाळी ६ वाजता स्टेशन रोड शेळके एजन्सी समोर प्लॉटमध्ये आयोजित केल्या असून यासाठी ड्रेस कोड काळा टी शर्ट असून हाय बी पी व हाय शुगरच्या रुग्णांनी स्वतःचे जबाबदारीवर स्पर्धेत भाग घ्यावा. सायं ६ वाजता संगीत रजनी गाण्यांचा कार्यक्रम सादरकर्ते सौ संमित्रा गणेश शिंदे व गणेश शिंदे विषय स्त्री जन्म रविवार दि ८ मार्च सकाळी १२ वाजता पाक कला स्पर्धा तांदुळापासून व खजुरा पासून बनविलेले पदार्थ (गूळ व साखर न वापरता केलेले पदार्थ ) नाव नोंदणी डॉ खाबिया व कल्याणी भालेराव,सायं ५ वाजता संगीत खुर्ची त्यानंतर सदर कार्यक्रम संपल्यावर रंग पंचमी निमित्त फनी गेम्स (नैसर्गिक व कोरडे कलर उपलब्ध करून देण्यात येतील. त्यानंतर दोन्ही विजेत्यांना बक्षीस वितरण,सोमवार दि ९ मार्च दुपारी ३ ते ५ वाजता रांगोळी स्पर्धा ठिपक्याची फ्री हॅन्ड दंतरोग शिबीर स्किन व कॉस्मेटिक चेक उप कॅम्प,नाव नोंदणी डॉ खाबिया व कल्याणी भालेराव,हस्त कला प्रदर्शन व विक्री अनिता गढदे व अर्चना रासने सायं ५ वाजता खेळ पैठणीचा मंगळवार दि १० मार्च दुपारी २ वाजता क्रिकेट स्पर्धा प्रत्येक मॅच ६ ओव्हर ची संघ ९ जणींचा त्यात ४ युवतीचा सहभाग असावा.सर्व व्यवस्था आयोजककडून उपलब्ध करून देण्यात येईल.बुधवार दि ११ मार्च सायं ५ वाजता फॅशन शो वेळेचे बंधन नाव नोंदणी रुपाली दळे, व आरती बिहाणी सायं ७ वाजता बक्षीस वितरण समारंभ दि ६ मार्च ते ११ मार्च बचत गटाचे स्टॉल दररोज दुपारी ३ ते रात्री ९ वाजेपर्यंत भरविण्यात येतील.

महिला बाल कल्याण समिती व राहुरी नगरपालिकेच्या वतीने साजरा होणाऱ्या राजमाता जिजाऊ महिला दिनाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन समितीच्या सदस्या लताबाई जगधने,संगीता जाधव,वृषाली तनपुरे,सिंधुताई डावखर,प्रियांका काशीद,आस्मा शेख,प्रसन्न वराळे मनीषा भोंगळ, मनीषा बर्डे तसेच नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे सर उपनगराध्यक्ष गजानन सातभाई व सर्व नगरसेवक मुख्याधिकारी यांनी केले. सर्व कार्यक्रम सौ भागीरथीबाई तनपुरे कन्या माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय येथे होतील.

# मसाले उद्योगातून रोजगार निर्मिती कार्यशाळा




**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्री शिव छत्रपती महाविद्यालयातील विद्यार्थिनी मंच विभागामार्फत आज मसाले उद्योगातून रोजगार निर्मिती या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली.याकार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या शिवनेरी मसाले च्या संचालिका स्वाती कबाडी यांनी व्यवसाय सुरू करताना पासूनचे आपले अनुभव कथन करून छोट्या छोट्या भांडवलातून प्रथम लघुउद्योग कसा सुरु करावा.वित्तीय व्यवस्थापन कसे करावे , याविषयी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले एकाच वस्तूचे उत्पादन करण्यापेक्षा छोट्या छोट्या अनेक वस्तूंचे उत्पादन करून नफा कसा मिळवता येतो. याविषयी त्यांनी आपले अनुभव विद्यार्थिनींना सांगितले तसेच विविध खडे मसाले यांची माहिती विद्यार्थिनींना दिली. अध्यक्ष स्थानावरून बोलताना महाविद्यालयाचे उपप्राचार्य .प्रा. डॉ.रवींद्र चौधरी यांनी सरकारी नोकऱ्यांच्या मागे न लागता घरबसल्या लघुउद्योग चालू करून विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वासाठी प्रयत्न करावेत. गांडूळ खत,खेकडे पालन,कुक्कुटपालन यासारख्या अनेक व्यवसायातून कसे जास्तीत जास्त उत्पादन मिळवता येईल याचे मार्गदर्शन करून ही कार्यशाळा राबवल्या बद्दल विद्यार्थिनी मंच विभागाचे कौतुकही केले.संस्थेचे अध्यक्ष ॲड संजय शिवाजीराव काळे, अध्यक्ष प्रतिनिधी प्रा विलास कुलकर्णी तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महादेव वाघमारे यांनी या कार्यक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यासपीठावर वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ.सतीश जाधव, मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. वंदना नढे,विद्यार्थिनी मंच प्रमुख प्रा.डॉ.वर्षा देसाई व विद्यार्थिनी मंचाचे सर्व सदस्य उपस्थित होते या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी मंच प्रमुख प्रा.डॉ. वर्षा देसाई यांनी केले. प्रास्ताविकातून त्यांनी मुलींना पुरुषांच्या बरोबर खांद्याला खांदा लावून चालायचे असेल तर आपल्याला स्वतःचे अस्तित्व निर्माण करायला हवे आणि यासाठी फक्त नोकरीच्या मागे न लागता उद्योग व्यवसायात आपले मन गुंतवा असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रेखा गायकवाड यांनी केले तर आभार प्रा.डॉ. रंजना पुराणे यांनी मानले.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

ऑल इंडिया पोस्टल एससी/ एसटी वेल्फेअर असोसिएशन अहिल्यानगर यांचे

# भव्य तिसरे द्विवार्षिक अधिवेशन संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

ऑल इंडिया पोस्टल एससी/ एसटी वेल्फेअर असोसिएशन अहिल्यानगर यांचे भव्य तिसरे द्विवार्षिक अधिवेशन हॉटेल पंचवटी डीएसपी चौक अहिल्यानगर येथे उत्साहात संपन्न झाले. यावेळी प्रमुख पाहुणे खासदार निलेश लंके व असोसिएशनचे सर्कल सेक्रेटरी जयराम जाधव उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे सीनियर पोस्ट मास्तर व अहिल्यानगरचे माजी एस एस पी सुरेश बनसोडे होते. कार्यक्रमास स श्री अमृत कुमटकर , सीनियर पोस्ट मास्तर ,अहिल्यानगर व श्री बाळासाहेब बनकर सहाय्यक अधीक्षक ,श्रीरामपूर डिव्हिजन व रिटायर एस एस पी अहिल्यानगर वाय पी साळवे व सेवानिवृत्त एस एस पी सातारा आर ए धस व रि. एपीएमजी बीएस पटारे साहेब मुंबई सर्कल ऑफिस विशेष उपस्थितीमध्ये होते. असोसिएशनचे महाराष्ट्र सर्कलचे अध्यक्ष तानाजी माने ,मुंबई , रविंद्र तिरपुडे , जनरल सेक्रेटरी वेस्ट झोन न्यू दिल्ली, के आर शीलवंत व राजू मोरे मेंबर न्यू दिल्ली , कार्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य प्रकाश कदम ,अमोल साळवे बारामती , दिगंबर सोनवणे कराड ,प्रवीण शिंदे , सेक्रेटरी श्रीरामपूर , योगेश शेजवळ ऑर्ग सर्कल सेक्रेटरी ,प्रवीण खंडागळे, श्रीरामपूर, प्रवीण जाधव रिजनल सेक्रेटरी मुंबई ,अर्जुन भोसले अध्यक्ष मुंबई आर एम एस डिव्हिजन , अनिल लोखंडे मुंबई , अमोल भुमकर मॅनेजर, आयपीपी बी मोहन शिरसाट रि. कृषी अधिकारी यवतमाळ ,आयुष्यमान दीपक पाटोळे , बौद्धाचार्य व लक्ष्मण माघाडे ,बौद्धाचार्य सिने अभिनेता शुभम निर्मळ ,श्रीमती कविता आढारी सर्कल खजिनदार महाराष्ट्र राज्य व गोवा राज्य ,आढारी साहेब पुणे , सातपुते सर ,एडवोकेट विद्या शिंदे ,विजय शिंदे , राजेंद्र राहींज , जीडीएस सोसायटीचे सेक्रेटरी राजेंद्र गवते उपस्थित होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून अनेक जिल्ह्यातून असोसिएशनचे जिल्ह्याचे असोसिएशनचे सेक्रेटरी अध्यक्ष व सभासद उपस्थित होते. ऑल इंडिया पोस्टल एससी एसटी वेल्फेअर असोसिएशन हे कर्मचाऱ्यांच्या कामकाजाविषयी अडचणी व समस्या व कर्मचाऱ्यांवर होणाऱ्या अन्याया विरुद्ध कर्मचाऱ्यांचे हितासाठी काम करणारी एकमेव संघटन असोसिएशन आहे. एससी एसटी वेल्फेअर असोसिएशन मध्ये सर्व जाती-धर्माचे लोक कर्मचारी समाविष्ट असून असोसिएशन सर्व जाती धर्माच्या कर्मचाऱ्यांचे समस्या व होणाऱ्या अन्यायाविरुद्ध सतत लढत असते प्रामुख्याने कर्मचाऱ्यांच्या अन्यायकारक बदल्या कर्मचाऱ्यांचे अनुकंप भरती बाबत कर्मचाऱ्यांचे प्रमोशन बाबत होणारे अन्याय व क्षम्य अपराधासाठी दिल्या जाणाऱ्या मोठ्या स्वरूपाची सजा चार्ज शीट किंवा बडतर्फ करणे प्रमोशन रोखने पगार रोखणे महिला कर्मचाऱ्यांच्या कामकाजाविषयी व वरिष्ठांकडून मिळणाऱ्या अपमानास्पद वागणुकीबद्दल. कर्मचाऱ्यां च्या अशा अनेक प्रकारच्या समस्या निवारण करण्याचे प्रयत्न असोसिएशन सतत करत असते करत असते.

## सारडा महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने "विरामचिन्हे दिवस" साजरा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**



पेमराज सारडा महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने २६ फेब्रुवारीला 'विरामचिन्हे दिवस'साजरा करण्यात आला. मराठी भाषेसाठी शब्दकोश, व्याकरण,लेखन,संपादन,भाषांतर असे अनेक प्रकारचे काम मेजर थॉमस कँडी यांनी केले. 'विरामचिन्हांची परिभाषा ' ही १६ पानांची पुस्तिका हे त्यांचे मराठी भाषेसाठी दिलेले सर्वात मोठे योगदान आहे. मेजर कॅन्डी यांच्या 150 व्या स्मृतिवर्षाला 26 फेब्रुवारीपासून सुरुवात होत आहे. त्यांच्या ' विरामचिन्हांची परिभाषा ' पुस्तिकेलाही 175 वर्षे पूर्ण झाली आहेत.त्यांचे हे योगदान लक्षात घेऊन त्यांच्या 150 व्या स्मृतिवर्षानिमित्त 26 फेब्रुवारी रोजी ' विरामचिन्हे दिवस ' साजरा केला गेला. या उपक्रमाला हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा. शिरीष मोडक,मानद सचिव संजय जोशी,कार्याध्यक्ष आणि वरिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.रमेश झरकर, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रा.वर्षा कीर्तने यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.तर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित होत्या.

डॉ.वर्षा कीर्तने म्हणाल्या," मराठी - इंग्रजी शब्दकोशकार मेजर थॉमस कँडी यांनी मराठी देवनागरीत लिहायला सुरुवात केली.आणि विरामचिन्हे पहिल्यांदा वापरली.पुढे विरामचिन्हांचा वापर लोकमान्य झाला. कॅन्डी यांचे मराठी भाषेसाठी दिलेले हे सर्वात मोठे योगदान आहे. " प्राचार्य माहेश्वरी गावित आपल्या अध्यक्षीय मनोगतात म्हणाल्या, "आपण जेव्हा बोलतो त्यावेळी आपले बोलणे ऐकणाऱ्याला अचूकपणे कळते.ते लिहिताना मात्र प्रमाणलेखनात असणे अपेक्षित आहे. वाचताना कुठे व किती वेळ थांबायचे आणि कोणत्या शब्दावर जोर द्यायचा यासाठी विरामचिन्हांचा उपयोग करावा.

## उदय जोशी यांच्या छायाचित्रास ज्युरी अॅवॉर्ड




**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अ. जि. म. वि. प्रसारक समाजाच्या न्यू आर्टस् कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या संज्ञापन अभ्यास विभागातर्फे आयोजित १९ वा प्रतिबिंब चित्रपट महोत्सव नुकताच संपन्न झाला. या निमित्ताने राष्ट्रीय प्रतिबिंब छायाचित्र स्पर्धा आयोजित केली होती. स्पर्धेचे हे चौथे वर्ष आहे. नैसर्गिक आपत्ती हा यावर्षीची फोटोग्राफीचा विषय होता. या स्पर्धेकरीता ५३२ छायाचित्रकारांनी प्रवेशिका पाठविल्या होत्या. यापैकी २९७ स्पर्धकातून उदय जोशी यांची ज्युरी अॅवाड मिळाला आहे. दिग्दर्शक संकेत पावसे, व्हाईस प्रिन्सिपल डॉ. बाळासाहेब सागडे, अ. जि. म. वि. प्र. समाजाचे अध्यक्ष रामचंद्र दरे, प्रा. संदिप गिन्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत न्यू आटर्सच्या राजर्षी शाहू महाराज सभागृहात हा समारंभ संपन्न झाला. नैसर्गिक आपत्ती या विषयाला अनुसरून आगडगाव परीसरातील छायाचित्राला पारीतोषिक मिळाले असून सदर पाण्याकरीता आलेल्या टॅकमधील पाणी भरतानाचे ते छायाचित्र आहे. महिला पुरूषांनी गदी केली आहे पाणी परत कधी मिळणार यामुळे पाणी साठवून ठेवण्यासाठी आपल्या घरातील सर्व साहित्य ज्यात पाणी साठवता येईल ते आणले होते.

त्यावेळी टैकर कमी येत असल्याने पाण्यासाठी गदी होत होती याकरीता सर्वजण लहान मुले, महिला वृध्द नागरिकही मदत करत होते. या यशाबददल विविध मान्यवरांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## वारकरी संप्रदायाने दाखवली भक्तीची शक्ती : प्रदीप वाघ

**पालघर : (समर्थ गांवकरी)**

मोखाडा तालुका वारकरी संप्रदायाच्या वतीने साई मंदिर, मोखाडा येथे महावैष्णव मेळाव्याचे भव्य दिव्य आयोजन करण्यात आले. तालुक्यात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या या मेळाव्यामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. या मेळाव्यास हजारो वारकरी बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत एकत्र येऊन भक्तीची एकजूट आणि शक्ती दाखवून दिली असे पहिल्या दिवशी माजी उपसभापती प्रदीप वाघ आपल्या मनोगतातून व्यक्त झाले. टाळ-मृदुंगाच्या गजरात, अभंग-कीर्तनांच्या सुरावटीत आणि विठ्ठल नामाच्या घोषात साई मंदिर परिसर दुमदुमून गेला असेही वाघ म्हणाले.

भा. ज. पा. मध्य मंडल व क्रांतीवीर चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठानच्या वतीने

## स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त अभिवादन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांनी जाज्वल्य विचार दिला. स्वातंत्र्यासाठी यातना सहन केल्या आसूडाचे फटके खाल्ले अश्या विज्ञाननिष्ठ समाजसुधारक, सामाजिक समरसतेचा विचार रूजवणारे हिंदू नेता विनायक दामोदर सावरकर यांना आम्ही विनम्र अभिवादन करत आहोत. त्यांच्या स्मृती, त्यांचे विचाराचे जतन करून त्यांच्या प्रखर राष्ट्रभकती, राष्ट्रविचार हे आपल्या जीवनात कसे उतरवता येतील आणि राष्ट्राबददलचा जो अभिमान आहे तो अभिमान कश्याप्रकारे जागृत करता येईल आपला संकल्प करू या येणार विकसित भारताला स्वातंत्र्यवीर सावरकराचे विचार एक चांगली दिशा देतील. आज मोदीजी जे काम करत आहेत ते खऱ्या अथाने स्वातंत्र्यवीर सावरकरांचे बीज आहे त्या बीजातून झालेली ही उत्पत्ती त्यांचा विचार घेउन हे राष्ट्र येणाऱ्या काळात एक विकसित होईल विकसित भारत सक्षम भारत पाहायला मिळेल असे प्रतिपादन भारतीय जनता पार्टी मध्य मंडलचे अध्यक्ष मयूर बोचूघोळ यांनी केले. भारतीय जनता पार्टी मध्य मंडल व क्रांतीवीर चंद्रशेखर आझाद युवा प्रतिष्ठानच्या वतीने स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त चौपाटी कारंजा येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामचे प्रांत सदस्य गजेंद्र सोनावणे, भाजपा मध्य मंडलाचे अध्यक्ष मयुर बोचुघोळ,भाजपा कार्यालयीन मंत्री मुकुल गंधे, , प्रशांत मुथ्था,सुनिल सकट, सचिन पळशीकर, निरज राठोड, लक्ष्मीकांत तिवारी,प्रकाश जोशी, देवेंद्र दुधाले, बाळासाहेब खताडे, डॉ.दशन करमाळकर, पियुष तावरे, सुनील तावरे, आदीनाथ येंडे, उदय अनभुले, संतोष गांधी, कुंडलिक गद्दादे,आनंद भळगट,विरेश क्षीरसागर आदी उपस्थित होते. मयुर बोचुघोळ म्हणाले, स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांचे स्वातंत्र्य चळवळीत मोठे योगदान राहिले आहे. त्यांनी तरुण-युवकांमध्ये स्वातंत्र्याची ज्वला प्रज्वलीत करण्याचे काम केले. प्रखर देशभक्तीचे मुर्तीमंत उदाहरण म्हणजे स्वातंत्र्यवीर सावरकर होय. त्यांचे विचार आणि लेखन हे प्रत्येक पिढीसाठी नेहमीच मार्गदर्शक राहणार आहे.




## आनंदगड शैक्षणिक संकुलामध्ये ४७ विद्यार्थ्यांनी केले रक्तदान

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

आंतरभारती रुरल इंटरनॅशनल मेडिकल एज्युकेशन ट्रस्ट, विरगाव संचलित मातोश्री राधा कॉलेज ऑफ फार्मसी व आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज विरगाव आणि रोटरी क्लब अकोले सेंट्रल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात 47 विद्यार्थ्यांनी रक्तदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. या रक्तदान शिबिरामध्ये रोटरी क्लब चे अध्यक्ष अमोल देशमुख,सचिन शेटे व डॉ.प्रकाश वाकचौरे यांनीही रक्तदान केले. आधार रक्तपेढी संगमनेर यांच्या सहकार्याने हे रक्तदान शिबिर यशस्वी पार पडले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे होते.तर यावेळी रोटरी क्लब चे अध्यक्ष अमोल देशमुख, माजी अध्यक्ष तथा डिस्ट्रिक्ट डायरेक्टर सचिन देशमुख, सचिन शेटे, प्रा.विद्याचंद्र सातपुते,संस्थेच्या संचालिका सौ.सुप्रियाताई वाकचौरे, सौ.गीता रहाणे, सौ.प्रतीक्षा रहाणे-म्हस्के,फार्मसी कॉलेजच्या प्राचार्या डॉ.पल्लवी फलके, धर्मवीर आनंद दिघे इंग्लिश मिडीयम स्कुल चे प्राचार्य किरण चौधरी ,पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य मिmलिंद सुर्वे, दोन्ही कॉलेजचे सर्व प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विविध स्पर्धा मध्ये,उपक्रमात फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा मध्ये,उपक्रमाध्ये मिळविलेल्या यशाबद्दल मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वाटप करण्यात आले. प्राचार्य डॉ.पल्लवी फलके यांनी कॉलेजने वर्षभरात केलेल्या कार्याचा वार्षिक अहवाल सादर केला.व रोटरी क्लब अकोलेचे नेहमीच असलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तर सौ.प्रतीक्षा रहाणे यांनी रक्तदान शिबीर या सामाजिक उपक्रमाचे कौतुक केले.अशा उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये समाज कार्याचे बीजारोपण होते असे मत व्यक्त केले व रोटरी क्लब ने असेच सहकार्य पुढेही असू द्यावे ही पेक्षा व्यक्त केली. रोटरी चे माजी अध्यक्ष सचिन देशमुख यांनी रोटरी च्या कार्याचा आढावा घेतला,आनंदगड शैक्षणिक संकुलाचे उभारणी, त्याची प्रगती व छोट्या रोपट्याचे वटवृक्षात झालेले रूपांतर या मागे अध्यक्ष रावसाहेब वाकचौरे, सचिव डॉ. अनिल रहाणे व सर्व सदस्य यांचे महत्वपूर्ण योगदान असून ते आमचे आदर्श आहेत असे गौरवदगार काढले तर रोटरी चे अध्यक्ष अमोल देशमुख यांनी रक्तदान शिबिरात सर्वांनी योगदान द्यावे असे आवाहन केले व आनंदगड शैक्षणिक संकुलासाठी रोटरी क्लब नक्कीच सहकार्य करीत राहीन असे आश्वासित केले.आभार प्रदर्शन प्रा. संदीप थोरात यांनी जागतिक मराठी दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा देत सर्वांचे आभार मानले.सूत्र संचालन प्रा. पायल कुटे आणि प्रा.सोनाली गव्हाळे यांनी केले तर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व प्राध्यापक, कर्मचारी ,विद्यार्थी यांनी विशेष परिश्रम घेतले.




## राष्ट्रध्वजाचा अवमान व अपमान

**शिवनेरी : (समर्थ गांवकरी)**

जुन्नर नगर परिषद येथील कार्यालयात मुख्याधिकारी चरण सहदेव कोल्हे , नगरपालिकेचे कर्मचारी दत्तात्रय बाजीराव मुंढे व कर्मचारी रेश्मा बाळासाहेब नाईकवाडी इतर कर्मचारी यांनी भारतीय राष्ट्रध्वजाचा अवमान , अपमान , अनादर व कर्तव्यात कसूर केल्याबाबत या दोषीवर राष्ट्रीय सन्मान अपमान प्रतिबंधक कायदा १९७१ चे कलम २ प्रमाणे जुन्नर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची मागणी जुन्नर प्रेस क्लब उपाध्यक्ष अमोल मनोहर गायकवाड यांनी लेखी स्वरूपात मागणी केली आहे. त्याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की , ६ सप्टेंबर २०२५ गणपती विसर्जन रोजी जुन्नर नगरपालिका पहिल्या मजल्यावर रात्रीचे ८ वा . नगराध्यक्ष यांच्या दलनामध्ये भारतीय राष्ट्रध्वज टेबल वरती पसरून त्यावर जेवणाचे डबे व जेवणाचे पाकीट त्या ठिकाणी जिलेबी व इतर पदार्थ देखील ठेवलेले होते.



## राज चेंबर कोठल्यात इफ्तार मार्केटला उसळली गर्दी

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

नगर येथील राज चेंबर, कोठला परिसरात इफ्तार खरेदीसाठी मुस्लिम बांधवांची मोठी गर्दी उसळलेली पाहायला मिळाली. संध्याकाळ होताच संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. राज चेंबर, कोठला येथे खास इफ्तार मार्केट सजले असून विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सनी परिसर गजबजून गेला आहे. समोसे, कबाब, काडी गोष, सीका कबाब, खजूर, सरबत, लस्सी, चिकन कबाब, चिकन रोल, ड्रायफ्रुट मस्तानी अशा अनेक चविष्ट पदार्थांनी बाजार रंगला आहे. विशेष म्हणजे मदिनेतून आणलेले खजूर, विविध प्रकारचे सरबत आणि पारंपरिक रमजान पदार्थांची मोठी मागणी दिसून येत आहे. इफ्तारसाठी लागणाऱ्या सर्व वस्तू एकाच ठिकाणी उपलब्ध असल्याने राज चेंबर, कोठला हे परिसरातील आकर्षणाचे प्रमुख केंद्र बनले आहे. खरेदीसाठी आलेल्या नागरिकांनी सांगितले की, दरवर्षीप्रमाणे यंदाही येथे मोठ्या प्रमाणात स्टॉल्स लागले असून वातावरण अत्यंत आनंददायी आणि उत्साहवर्धक आहे. पवित्र रमजानच्या निमित्ताने एकात्मता, बंधुभाव आणि धार्मिक श्रद्धेचे दर्शन राज चेंबर, कोठला येथे पाहायला मिळत आहे.

## मेहेरबाबाच्या जन्मोस्तव संपन्न

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर मधील सरोष पेट्रोल पंपाशेजारील अवतार मेहेरबाबा नगर केंद्रामध्ये अवतार मेहेरबाबाच्या १३२ वा जन्मोस्तव कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला सकाळी ५ ते ८ पर्यंत विविध कार्यक्रम झाले. नगरसह देश विदेशातील मेहेरप्रेमींनी गीते भजने सादर केली .तर पहाटे ६ वा अवतार मेहेरबाबा याचा जन्मोस्तव सोहळा आरती व प्रार्थनेने संपन्न झाला. सकाळी ९ वाजता मेहेरबाबाच्या सप्तरंगी ध्वजाचे अनावरण शीला कलचुरी फेंस्टर यांच्या हस्ते झाले , यावेळी ध्वजगीत, भजन,आरती झाली. यावेळी अध्यक्ष डॉ मेहेरनाथ कलचुरी, उपाध्यक्ष वैभव जोशी,दीपक थाडे,नितीन थाडे,मधुकर डाडर, सरला जोशी,आरती मांढरे, राहुल मुळे,माधुरी मिसाळ,श्रुती मुळे,प्रशांत डाडर याच्यासह नगरसह देश विदेशातील मेहेरप्रेमीं उपस्थित होते. कलचुरी म्हणाले बाबांना त्याची मंडळी म्हणाली आपल्या आध्यत्मिक मिशन साठी पवित्र चिन्ह,ध्वज आपल्याला पाहिजे तेव्हा प्रतेकांने तो आपल्या धर्माप्रमाणे भगवा,हिरवा,पांढरा आदि कलरचा असावा अशी मागणी केली तेव्हा शेवटी मेहेरबाबांनी सांगितले आपला सप्तरंगी ध्वज असेल त्यात सर्व ब्रम्हांड सामाऊन जाईल,सात रंग, म्हणजे सात संस्कार-विकार होय.काम,क्रोध,लोभ,मोह,मध,मत्सर,अहंकार हे सात विकार सोडणे,रंग रहित राहणे म्हणजे संस्कार होय. आत्मा हा रंग रहित असतो त्यामुळे बाबांनी हे रंग निवडले आत्मा हा परमात्म्यात एकरूप होतो व शुद्ध होतो.



# प्रशासनाशी झालेल्या यशस्वी चर्चेनंतर लाँग मार्च स्थगित

**पालकमंत्री विखे पाटील यांच्या यशस्वी मध्यस्थीने शेतकरी-कामगारांच्या मागण्या मान्य**

**शिर्डी : (समर्थ गांवकरी)**

अखिल भारतीय किसान सभा व सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन यांच्या संयुक्त विद्यमाने शेतकरी, कामगार आणि आदिवासींच्या उर्वरित प्रश्नांबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर मार्ग निघाला असून, आंदोलकांच्या सर्व मागण्या मान्य झाल्या आहेत. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या यशस्वी मध्यस्थीमुळे राजूर ते अहिल्यानगर निघालेला लाँग मार्च निझर्णेश्वर येथे स्थगित करण्यात आला आहे.



अकोले तालुक्यातील राजूर येथून अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर हा लाँग मार्च काढण्यात येत होता. या मोर्चामध्ये आदिवासी शेतकरी, कामगार, पोषण आहार तयार करणाऱ्या मदतनीस, वैद्यकीय क्षेत्रातील अर्धवेळ परिचर आपल्या मागण्यांसाठी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संगमनेर येथून निघालेला लाँग मार्च काल सायंकाळी निझर्णेश्वर येथे पोहोचला होता. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी प्रशासनाच्या माध्यमातून आंदोलकांशी सातत्याने संपर्क साधून मागण्यांबाबत तोडगा काढण्याचे आश्वासन दिले होते.

दोन दिवसांपूर्वी मंत्रालयात मंत्री विखे पाटील यांनी पुढाकार घेऊन आंदोलक व विविध विभागांचे मंत्री यांच्यात यशस्वी संवाद घडवून आणला होता. या बैठकीमध्ये आंदोलकांच्या बहुतांश मागण्या मान्य करण्यात आल्या होत्या. मात्र, शालेय शिक्षण व कामगार विभागाशी संबंधित असलेल्या मागण्या मान्य होत नसल्यामुळे आंदोलक आपल्या भूमिकेवर ठाम होते. निझर्णेश्वर येथे अतिरिक्त जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, प्रांताधिकारी अरुण उंडे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि इतर विभागांच्या अधिकाऱ्यांनी आंदोलकांशी संवाद साधला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेनंतर उर्वरित मागण्याही सरकारने मान्य केल्या असल्याचे सांगितले. त्यानंतर आंदोलन स्थगित करण्याची प्रशासनाची विनंती आंदोलकांनी मान्य केली.

अर्धवेळ परिचारकांच्या मानधनात सरकारने वाढ करण्याचा निर्णय घेतला असून, शालेय पोषण आहार मदतनिसांचे मानधनही वाढविण्यास सरकारने हिरवा कंदील दिला आहे. भंडारदरा धरणाचे हक्काचे पाणी आदिवासी भागाला मिळावे म्हणून, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सर्वेक्षणाला दिलेल्या आदेशाचे आंदोलनकर्त्यांनी स्वागत केले आहे. बांधकाम कामगारांना आता आरोग्य विमा योजनेतून सर्व सुविधा मिळण्याचा मार्ग सरकारच्या निर्णयामुळे सुकर झाला आहे.

आंदोलकांच्या मागण्यांबाबत सरकारची भूमिका सकारात्मक राहिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व मागण्यांबाबत महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन आंदोलकांना दिलासा दिला. या निर्णयाबद्दल पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले, तसेच आंदोलकांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचेही आभार व्यक्त केले आहेत.

# अलंकापुरीत भाविकांची दर्शनास गर्दी

- श्रींचे गाभाऱ्यात लक्षवेधी पुष्पसजावट ; इंद्रायणी आरती उत्साहात

**आळंदी :** (समर्थ गांवकरी)



येथील आमलकी एकादशी दिनी माऊली मंदिरात भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. परंपरेने विविध धार्मिक कार्यक्रमांतुन मंदिरात एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. पन्नास हजारावर भाविकांनी श्रींचे दर्शनास गर्दी केली. एकादशी दिनी भाविकांनी मंदिर, नगरप्रदक्षिणा करीत हरिनाम गजरात श्रींचे दर्शन घेतले. मंदिरातील श्रींचे गाभाऱ्यात लक्षवेधी पुष्प सजावटीने श्रींचे रूप लक्षवेधी दिसत होते. इंद्रायणी नदी घाटावर इंद्रायणी आरती सेवा समिती आळंदीचे वतीने इंद्रायणी आरती उत्साहात झाली. यावेळी ग्रामस्थ, महिला भाविकांची उपस्थिती होती.

आळंदी मंदिरात भाविकांनी परंपरेने एकादशी दिनी गर्दी करीत श्रींचे दर्शन घेतले. एकादशी दिनी श्रींचे मंदिरात पहाटे वेदमंत्र जयघोषात पवमान अभिषेक करण्यात आला. यावेळी आळंदी संस्थानचे पदाधिकारी, व्यवस्थापक, कर्मचारी, सेवक, मानकरी, पुजारी, कर्मचारी आदि उपस्थित होते. भाविकांना श्रींचे मंदिर दर्शनास कमी वेळेत जास्तीत जास्त भाविकांना दर्शन देण्याची व्यवस्था व्यवस्थापक माउली वीर, उपव्यवस्थापक तुकाराम माने यांनी सेवक, कर्मचारी, सुरक्षा रक्षक, पोलीस कर्मचारी यांचे सहकार्याने केली. मंदिरात दुपारचा फराळाचा महानैवेद्य, वारकरी शिक्षण संस्थेचे वतीने परंपरेने प्रवचन, रात्री धुपारती परंपरेने झाली. श्रींचे दर्शन, प्रदक्षिणा पूर्वी भाविकांनी इंद्रायणी नदी घाटावर स्नानास तसेच आचमनास गर्दी केली. आळंदी मंदिरात भाविकांनी धुपारतीस गर्दी केली. मंदिरात एकादशी दिनीच धार्मिक कार्यक्रम परंपरेने झाले. या मध्ये मंदिरात परंपरेने धार्मिक उपचार श्रीची पूजा, आरती, फराळाचा महानैवेद्य आदी धार्मिक कार्यक्रम झाले. यावेळी सुरक्षा रक्षक, सेवक आणि मंदिरातील बंदोबस्ता वरील पोलिसांनी विशेष परिश्रम घेतले. यासाठी आळंदी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके, पोलीस नाईक मच्छिन्द्र शेंडे, वाहतूक पोलीस शाखेचे पोलीस कर्मचारी यांनी आळंदीतील वाहतुकीचे सुरळीत नियोजन परिश्रम पूर्वक केले. आळंदीत सुरक्षित, सुरळीत वाहतूक राहावी यासाठी आळंदी दिघी वाहतूक पोलीस शाखेने कामकाज पाहिले. आळंदीतील रहदारीची वर्दळ पाहता येथे वाहतुकीचे केलेले प्रभावी नियोजन यामुळे भाविक, नागरिक यांना वाहतुकीचे कोंडीतून एकादशी दिनी सोय झाली. आळंदीत भाविकानी पोलीस प्रशासनाच्या कार्याचे कौतुक केले. आळंदीत बेकायदेशीर वाहन पार्किंग आणि बेशीस्त वाहन चालकांवर कारवाई सुरु आहे. कारवाई टाळण्यासाठी आळंदीत रस्त्यावर वाहने पार्क करू नये असे आवाहन पोलीस प्रशासनाने केले आहे. आळंदीत बांधकाम परवानगी देताना मंजूर प्लॅन आणि प्रत्येक्षात झालेले बांधकाम आणि यात पार्किंगच्या जागांचा गैर वापर होताना आढळून आल्यास करावा करण्याचा इशारा नगरपरिषदेचे वतीने देण्यात आला आहे. या साठी फेर सर्व्हे करून पार्किंगच्या जागा पार्किंग साठी वापरल्या जाण्यासाठी दक्षता घेण्याचे सूचना देण्यात आल्या आहेत. आळंदीत पार्किंग रस्त्याचे दुतर्फा न करता इमारती खालील पार्किंगचे जागेत वाहने पार्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




ठाणे : दिव्यात मराठी भाषा दिनानिमित्त बेधडक ठाणे न्युजचा ६ वा वर्धपान दिन व "नव विचार ठाण्याचा" या नूतन साप्तहिकाचे प्रकाशन करण्यात आले. दिवा शहरातील आकांक्षा हॉल मध्ये सदर सोहळा अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपादक व पत्रकार अमित जाधव यांनी आयोजित केला होता. ( फोटो - संतोष पडवळ )

## बांधकाम व रिअल इस्टेट नवकल्पनांसाठी 'सेंटर ऑफ एक्सलन्स'

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

जवळपास चार दशकांचा वारसा असलेल्या अग्रगण्य EPC आणि रिॲल्टी क्षेत्रातील कंपन्यांपैकी एक वॅस्कॉन इंजिनिअर्स लिमिटेड (VASCONEQ) ने कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग पुणे येथे उत्कृष्टता केंद्राची उभारणी केली आहे. ही सुविधा सीओईपी कॅम्पसमधील निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये विकसित करण्यात आली असून एकूण बांधकाम क्षेत्र 18,000 चौ.फूट आहे. उत्कृष्टता केंद्राची निर्मिती




बांधकाम, रिअल इस्टेट आणि पायाभूत सुविधा क्षेत्रांशी संबंधित तंत्रज्ञानांच्या संशोधन, चाचणी आणि अंमलबजावणीस पाठबळ देण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून करण्यात आली आहे. या सुविधा केंद्राचा काही भाग CREDAI सोबत विकसित करण्यात येणार आहे. तर दुसऱ्या भागात इंडियन प्लंबिंग असोसिएशन (IPA) यांच्या सहकार्याने अत्याधुनिक प्लंबिंग लॅब उभारण्यात येणार आहे. हे केंद्र लाईव्ह तंत्रज्ञान प्रात्यक्षिके, पथदर्शी प्रकल्प, शैक्षणिक-औद्योगिक कार्यशाळा, संशोधन सहकार्य आणि ज्ञानाची देवाणघेवाण यांना सक्षम करेल. यामुळे विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना आणि संशोधकांना प्रत्यक्ष क्षेत्रातील उपाययोजन आणि सध्याच्या औद्योगिक पद्धतींचा अनुभव मिळेल.

## फिनिक्स मार्केटसिटी विमाननगरमध्ये पुण्यातील सर्वात मोठा ॲनथलीजर आणि स्पोर्ट्सवियर झोन सादर

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

फिनिक्स मार्केटसिटी पुणे आता शहरातील स्पोर्ट्स आणि ॲथलीजर खरेदी अनुभव आणखी सोपा आणि आनंददायी बनवत आहे, कारण अनेक प्रसिद्ध ब्रँड्सचे स्टोअर्स आता एका ठिकाणी उपलब्ध आहेत. यामध्ये नाइकी, ॲडिडास, असिक्स, स्केचर्स यांचे प्रमुख फ्लॅगशिप स्टोअर्स आहेत, तसेच न्यू बॅलन्स, रिबॉक, प्यूमा, एक्सस्टेपसारखे ब्रँड्स देखील येथे आहेत. या नवीन झोनमुळे पुण्यातील खरेदीदारांना स्पोर्ट्स आणि ॲथलीजर उत्पादनांचे अनेक पर्याय एकाच ठिकाणी मिळतात. फिनिक्स मार्केटसिटीने या झोनच्या माध्यमातून पुण्यातील वाढती फिटनेस संस्कृती आणि बदलत्या ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन एक खास स्पोर्ट्स आणि ॲथलीजर झोन तयार केला आहे.हा नवीन




झोन पुण्यात होत असलेला बदल दाखवतो. आता अनेक लोकांसाठी ट्रेनिंग ही रोजची सवय बनली आहे. रनिंग कम्युनिटी वेगाने वाढत आहेत. ॲरथलीजर आता फक्त खेळापुरता मर्यादित नसून तो दैनंदिन स्टाइलचा भाग बनला आहे. फिनिक्स मार्केटसिटीने या बदलांना प्रतिसाद देत एक नवीन झोन तयार केला आहे. येथे ग्राहक प्रीमियम आणि आकर्षक स्टोअर्समध्ये खरेदीचा आनंद घेऊ शकतात, तसेच पुण्यात पहिल्यांदाच सादर केली जाणारी उत्पादने पाहू शकतात. याबद्दल बोलतांना, श्री अंशुमन भारद्वाज, सिनिअर सेंटर डायरेक्टर, फिनिक्स मॉल्स [पुणे] म्हणाले,"फिनिक्स मार्केटसिटी पुणे नेहमीच असे अनुभव देण्यावर लक्ष केंद्रित करत असते जे शहरासाठी उपयुक्त आणि महत्त्वाचे आहेत. स्पोर्ट्स आणि ॲरथलीजर झोन हा त्याच दिशेने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. प्रमुख स्टोअर्स एका ठिकाणी एकत्र आल्यामुळे, आम्ही खेळांमध्ये रस असलेल्या खरेदीदारांसाठी तसेच ज्यांच्यासाठी ॲथलीजर दैनंदिन पोशाखाचा भाग आहे त्यांच्यासाठी एक उत्तम ठिकाण तयार केले आहे."

नाइकी हा या झोनमधील मुख्य आकर्षण आहे. हा महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या स्टोअर्सपैकी एक असून पुण्यातील एकमेव फ्लॅगशिप स्टोअर आहे.

## देळूब बु.येथे आज सार्वजनिक शिवजन्मोत्सवा निमित्त व्याख्यानाचे आयोजन

**अर्धापूर :** (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील देळुब बु.येथे शिवजन्मोत्सवा निमित्त शिवव्याख्याते शिवश्री किशन जाधव पाटील यांचे व्याख्यान दि.२८ शनिवारी रोजी सायंकाळी ७ वा.होणार आहे शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सार्वजनिक शिवजयंती समितीचे अध्यक्ष शैलेश पाटील लोमटे यांनी केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त देळूब बुद्रुक समस्त गावकरी मंडळी व सार्वजनिक शिवजयंती निमित्ताने शिवव्याख्याते शिवश्री किशन जाधव पाटील यांचे व्याख्यान आयोजित केले आहे.

## मराठी भाषा जतन करण्याची गरज : प्रा. डॉ. सुनिल घनकुटे

**अकोले :** (समर्थ गांवकरी)

मराठी भाषा जतन करण्याची गरज आहे.जो पर्यंत मराठी माणूस जिवंत आहे तोपर्यंत मराठी भाषेला मरण नाही. मराठी भाषा आपले आई,वडिल व पूर्वीच्या पिढ्यांनी जतन केली आहे. तोच ठेवा आपल्या पुढील पिढीने जतन व संवर्धित करावे असे आवाहन प्रा. डॉ. सुनिल घनकुटे यांनी केले.

येथील जनजाती कल्याण आश्रम येथे मराठी भाषा गौरव दीन व एन एम एम एस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. सुनिल घनकुटे बोलत होते. याप्रसंगी नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, भाजपचे मंडलाध्यक्ष राहुल देशमूख, रोटरी डिस्ट्रिकट 3232 चे सहा. प्रांतपाल अमोल वैद्य,युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष प्रतिक वाकचौरे, सेवानिवृत प्राचार्य




व वसतिगृह पालक रामदास सोनवणे,जनजाती कल्याण आश्रमाचे जिल्हाध्यक्ष संतोष कचरे,कोषाध्यक्ष वैभव व्यवहारे, सौ.संगिता कचरे, अधीक्षक सुनिल ठाकरे व सौ.कल्पना ठाकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. डॉ.घनकुटे पुढे म्हणाले की,जगभरातील ज्या ज्या देशात मराठी माणूस आहे. तेथे मराठी भाषा गौरव दिन उत्साहात साजरा केला जातो ही आपल्या सर्वांच्या् दृष्टीने आनंदाची व समाधानाची बाब आहे. देशात प्रमुख 22 बोली भाषा आहेत. त्यात मराठी भाषा तीन नंबर वर आहे. गेल्या वर्षी मराठी भाषेला राज्यभाषेचा दर्जा देण्यात आला. मराठी भाषेत साहित्याची परंपरा अनेक साहित्यिकांनी निर्माण केली. मराठी मधील पहिला शिलालेख जुन्नर येथील नाणेघाट मध्ये सापडला. जगभरात 1800 बोली भाषा व देशाती 700 बोली भाषा आहेत. साहित्य हे मराठी भाषेत, बोली भाषेत लिहा असे आवाहन त्यांनी केले.

भाषा जतन केली पाहिजे. तिचे संवर्धन करणे गरजेचे आहे. मराठी भाषा टिकविण्यासाठी सर्व संत, महंत, शाहिर यांनी काम केले आहे. साहित्य वाचले पाहिजे. पुस्तके माणसांशी बोलत असतात. विद्यार्थ्यांनी आयुष्यभर चांगले वाचत राहिले पाहिजे.वाचनाने माणूस समृद्ध होत असतो.आपण ग्रामीण,आदिवासी,डोंगराळ भागातून आल्याचा न्यूनगंड बाजूला ठेवला पाहिजे.आत्मविश्वास ठेवला तरच जीवनात मोठे व्हाल असे त्यांनी सांगितले.मराठी भाषा ही वाघीनीचे दूध आहे. प्रत्येक भाषेची संस्कृती वेगळी आहे. ती जपण्याचे कार्य सर्वांचे असल्याचेही प्रा. डॉ. घनकुटे यांनी सांगितले. प्रास्ताविक व स्वागत जनजाती कल्याण आश्रमाचे जिल्हाध्यक्ष संतोष कचरे यांनी केले. सूत्रसंचालन ऋषीकेष जाधव यांनी करून शेवटी आभार मानले.

## मुख्याधिकारी व नगररचना अभियंत्यांवर कारवाईची मागणी

**हिंगोली :** (समर्थ गांवकरी)

वसमत शहरातील अतिक्रमण धारकांना अभय देऊन तक्रारदाराची दिशाभूल व फसवणूक केल्याचा आरोप करत वसमत नगरपरिषद प्रशासनातील जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी व निलंबनाची कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सय्यद रफिक कंकर (मुख्याधिकारी), नागनाथ देशमुख (बांधकाम अभियंता) आणि महेश बिरादार (नगर रचना विभाग प्रमुख) यांनी अतिक्रमण हटविण्याबाबत ठोस कारवाई न करता वेळकाढूपणा केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

शहरातील कातनेश्वरकर कॉम्प्लेक्स ते दलितवाणी प्रेस परिसरातील रस्त्याच्या कामात मूळ नकाशानुसार 15 मीटर रुंदीचा रस्ता विकसित करण्याऐवजी सुमारे 9 मीटर रुंदीने काम सुरू असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच




मुख्य रस्त्यावरील विविध ठिकाणी अतिक्रमण असल्याचे नमूद करत मूळ नकाशा प्रमाणे रस्ता खुला करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणात अतिक्रमण हटविण्याबाबत वारंवार निवेदने देऊनही कारवाई न झाल्याने 23 ते 26 डिसेंबर 2025 दरम्यान चार दिवस आमरण उपोषण करण्यात आल्याचेही निवेदनात म्हटले आहे.

अतिक्रमण हटविण्याबाबत दिलेल्या लेखी आश्वासनाची पूर्तता न झाल्याचा आरोप करत प्रशासनावर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. प्रकरणात अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती च्या जिल्हा उपाध्यक्षांनी कारवाईची मागणी केली असून सर्वोच्च न्यायालय भारत यांच्या अनधिकृत बांधकाम हटविण्याबाबतच्या निर्देशांचा उल्लेखही निवेदनात करण्यात आला आहे. अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करून निलंबनाची कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. हे निवेदन अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समिती चे जिल्हा उपाध्यक्ष आनंद खरे यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले असून प्रकरणी तात्काळ दखल घेऊन कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

## बारावी परीक्षेत हलगर्जीपणा


**नायगाव :** (समर्थ गांवकरी)

नायगाव तालुक्यातील उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा २०२६ दरम्यान झालेल्या जीवशास्त्र विषयाच्या पेपर च्या दिवशी गंभीर हलगर्जीपणामुळे नायगाव तालुक्यातील बहुचर्चित राणी लक्ष्मीबाई परीक्षा केंद्रातील केंद्रसंचालक व संबंधित पर्यवेक्षकांवर निलंबनाची कारवाई संस्था चालक यांच्या कडे पत्र पाठवून जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने माध्यमिक शिक्षणाधिकारी नांदेड यांच्या कडून पत्र पाठवून प्रस्तावित करण्यात आली आहे.या मुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे. कदम धनाजी सहशिक्षक संत ज्ञानेश्वर विद्यालय धुपा, केंद्रसंचालक (राणी लक्ष्मीबाई कनिष्ठ महाविद्यालय, ता. नायगाव) यांच्याकडे इयत्ता १२ वी परीक्षेचे केंद्रसंचालक म्हणून जबाबदारी होती.

## सिने ॲवॉर्ड्समध्ये धर्मेंद्र यांना खास संगीत श्रद्धांजली

**पुणे :** (समर्थ गांवकरी)

भारतीय चित्रपटसृष्टीचा झगमगाट आणि भव्यता 'मारुती सुझुकी प्रस्तुत 24वे झी सिने ॲवॉर्ड्स 2026'मध्ये पूर्णत्वाने चमकणार आहे. या संध्येमध्ये कलावंतांचे कौशल्य, भावना आणि चाहते व कलाकारांमधील नाते यांचा भव्य उत्सव साजरा केला जाईल. संगीताच्या सुरांनी रंगलेला हा सोहळा उंचावत असताना दिवंगत धर्मेंद्र यांची सदाबहार परंपरा मिथुन आणि पलक मुच्छल यांच्या खास संगीतात्मक श्रद्धांजलीतून मनोभावे साजरी केली जाणार आहे. त्यांच्या कारकिर्दीचा खरा आत्मा आणि प्रभाव या सादरीकरणातून सुंदरपणे प्रकट होईल. प्रेक्षकही या भव्य कार्यक्रमाचे प्रत्यक्ष साक्षीदार होण्यासाठी तिकीट बुक करून सहभागी होऊ शकतात. हे सादरीकरण गेल्या सहा दशकांतील त्या सिनेमाला उजाळा देईल. या काळाने प्रेक्षकांची मने



जिंकली, अनेक पर्वे निश्चित केली आणि पिढ्यान्पिढ्या कलाकार व निर्मात्यांना प्रेरणा दिली. धर्मेंद्रजी फक्त एक सुपरस्टार नव्हते; तर ते सिनेमाचे उबदार, निर्भय, करुणामय आणि अगदी खरे धडधडते हृदय होते. त्यांच्या अपार उदारतेमुळे आणि दयाळू स्वभावामुळे त्यांची परंपरा आजही पुढील पिढ्यांमध्ये जिवंत आहे. 2005 मध्ये झी सिने ॲवॉर्ड्समध्ये त्यांना लाइफटाईम अचिव्हमेंट ॲवॉर्ड देण्यात आला होता. त्या वेळी त्यांनी भावूक होऊन म्हटले होते, "मला खूप ॲवॉर्ड्स मिळत नाहीत, पण मिळाले की माझे चाहते स्वतःला माझ्यात पाहतात. आज जेव्हा मी हा ॲवॉर्ड हातात घेतो, तेव्हा मला माझे चाहते दिसतात, म्हणून ही संध्या मी माझ्या सर्व प्रिय चाहत्यांना समर्पित करतो." या खास श्रद्धांजलीच्या सादरीकरणापूर्वी, मुंबईत झी तर्फे आयोजित पत्रकार परिषदेत मिथुन यांनी आपल्या भावना व्यक्त करत या परफॉर्मन्सबद्दल सविस्तर माहिती दिली. त्याने सांगितले, "यंदाच्या झी सिने ॲवॉर्ड्स 2026 मध्ये पलक आणि मी दिग्गज अभिनेते धर्मेंद्रजींना संगीतात्मक श्रद्धांजली अर्पण करणार आहोत. भारतीय चित्रपटसृष्टीतील अनेक अजरामर गाणी त्यांच्या वारशाचा भाग आहेत, ज्यामागे लक्ष्मीकांत-प्यारेलाल, मदन मोहन आणि महान पंचम दा यांसारखे कालातीत संगीतकार आहेत.

## अंगणवाडीला सामाजिक उपक्रमातून साहित्य भेट

**कंधार :** (समर्थ गांवकरी)

सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागातील बालकांच्या शैक्षणिक सुविधांसाठी क्रेडिटएक्ससेस लिमिटेड यांच्या सामाजिक विकास उपक्रमांतर्गत कंधार तालुक्यातील फुलवळ येथील अंगणवाडीला आवश्यक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमात अंगणवाडीतील बालकांसाठी 77 लहान खुर्च्या, 7 मोठ्या खुर्च्या, 4 मोठे गालिचे तसेच सतरंजी व इतर साहित्य देण्यात आले. या साहित्यामुळे बालकांना सुरक्षित, स्वच्छ आणि आरामदायी वातावरणात बसून शिक्षण घेता येणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्या तथा नांदेड जिल्हा महिला कॉंग्रेसच्या उपाध्यक्षा सौ. वर्षाताई संजय भोसीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सेवानिवृत्त कृषी अधिकारी विश्वंभर मंगनाळे, संस्थेचे विभागप्रमुख एस. के. मुख्तार, कंधार शाखा प्रमुख दशरथ कदम, नांदेड जिल्हा क्रॉंग्रेस कमितीचे सरचिटणीस बसवेश्वर मंगनाळे आदी मान्यवर उपस्थित होते. अंगणवाडी सेविका, मदतनीस, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामीण भागातील बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मत वर्षाताई भोसीकर यांनी व्यक्त केले. समाजातील विविध घटकांनी शिक्षण क्षेत्रात योगदान दिल्यास भविष्यात सक्षम पिढी घडेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. या उपक्रमामुळे अंगणवाडीतील मुलांना अधिक चांगल्या वातावरणात शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली असून पालकांनी समाधान व्यक्त केले.

# पाण्यासाठी सायदे ग्रामस्थांचे थेट टाकीवर धरणे आंदोलन

- बारा पाड्यात आहे तीव्र पाणीटंचाई
- जे जे एमच्या अपूर्ण कामामुळे पाण्याचे दुर्भीक्ष

**पालघर :** (समर्थ गांवकरी)

मोखाडा तालुक्यातील सायदे महसूल ग्रामपंचायत हद्दीतील मौजे वाघाची वाडी सावरपाडा हट्टीपाडा अंधेरवाडी हुंड्याची वाडी बादल पाडा खडकवाडी मारुतीची वाडी बोरीची वाडी जांभूळवाडी इत्यादी 12 गाव पाड्यात तीव्र पाणीटंचाई भेडसावत आहे त्यामुळे येथे तातडीने पाणीपुरवठ्याची व्यवस्था करावी यासाठी सायदे आणि बारा गाव पाड्यातील ग्रामस्थांनी थेट जल जीवन मिशन च्या टाकीजवळ धडक धरणे आंदोलन केले आहे यावेळी पाण्याची व्यवस्था करा अन्यथा धरणे आंदोलन तीव्र करू असा



एकच सूर लावला होता.त्यापुढे जलजीवन मिशनचे अधिकारी व संबंधित ठेकेदार यांनी नमते घेऊन 31 मार्च पर्यंत काम चालू करण्याचे आश्वासन दिले आहे त्यामुळे तूर्तास हे धरणे आंदोलन रहित झाले असले तरी पुन्हा येथील पाणी पेटण्याची दाट शक्यता ग्रामस्थांच्या चर्चेवरून दिसून आली आहे मोखाडा तालुक्यात सर्वत्र शेकडो कोटीची जलजीवन मिशनची कामे करण्यात आलेली आहेत यातील काही ठिकाणी हर घर नल योजनेतून पाणीपुरवठा सुरू करण्यात आलेला आहे तर काही ठिकाणी नुसत्याच टाक्या उभ्या केलेल्या आहेत त्यामुळे टाकीत पाणी दिसत असले तरी ग्रामस्थांना त्याचा उपभोग घेता येत नाही व येथून किंवा पाण्यासाठी बसवलेल्या व्हालव्ह मधून तहानलेल्या ग्रामस्थांनी परस्पर पाणी उपसा केला तर अशा ग्रामस्थांवर पोलीस तक्रार दाखल करण्याचे धमकी संबंधितांकडून दिली जात आहे तसेच या ठिकाणी जल जीवन मिशनचे काम झाले असल्यामुळे टँकर द्वारे पाणीपुरवठाही केला जात नाही त्यामुळे येथील ग्रामस्थांची आई जेवू घालीना तर बाप भीक मागू देईना अशी अवस्था झालेली आहे याबाबत तातडीने कार्यवाही होणे अपेक्षित आहे परंतु जल जीवन मिशनचे करोडो रुपये निधी ठेकेदारांना देय असल्याने थकीत निधी मिळत नाही तोपर्यंत संबंधित ठेकेदारांनी काम करण्यासाठी हात आखडता घेतलेला आहे त्यामुळे ज्यांच्यासाठी या योजनेचा घाट घातला तेच आज चातकासारखे तहानलेले राहिलेले आहेत एकीकडे शासन निरनिराळ्या योजना काढून त्यासाठी निधीची तरतूद करीत आहे परंतु पाण्यासारख्या बाबतीत मात्र कमालीची दिरंगाई होत आहे

दरम्यान जल जीवन मिशनचे कनिष्ठ अभियंता कुणाल पवार आणि संबंधित गावासाठीच्या योजनेचे उप ठेकेदार श्रीमान मोदी यांनी ग्रामस्थांची भेट घेऊन त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला परंतु तहानलेले ग्रामस्थ धरणे आंदोलनावर ठाम होते एक तर काम पूर्ण करण्याची निश्चित तारीख लेखी स्वरूपात द्या आणि तोपर्यंत आमची पाण्याची सोय करून द्या असा सूर सर्व ग्रामस्थांनी लावला होता त्यामुळे जल जीवन मिशन ने येथील ग्रामस्थांना दिनांक 31 मार्च पर्यंत कामाला सुरुवात करतो तसेच ज्या ठिकाणी व्हालव्ह मधून पाणी देणे शक्य नसेल तेथे टँकरद्वारे तर इतर ठिकाणी व्हालव्ह द्वारे पाणी देण्याचे लेखी अभिवचन दिले आहे त्यामुळे येथील धरणे आंदोलन सध्या थांबवण्यात आलेले आहे परंतु जल जीवन निधीच उपलब्ध झाला नाही तर येथील कामे करणे दुरापास्त असल्याने येथील ज्वलंत पाणी प्रश्न पुन्हा नव्या दमाने पेट घेण्याची शक्यता नाकारता येत नाही .

> आजच्या आंदोलनातील लेखी पत्राने फलित मिळाले असले तरी आम्ही जोपर्यंत पाणी मिळत नाही तोपर्यंत शांत बसणार नाही आमच्यावर कितीही केसेस झाल्या तरी त्या आम्ही अंगावर घेयाला तयार आहोत परंतु आमचा पाण्याचा न्याय हक्क मिळविल्याशिवाय गप्प बसणार नाही निधीची अडचण ही शासनाने कोणत्याही मार्गाने पुरी करावी परंतु आम्हाला आमचे हक्काचे पाणी दिलेच पाहिजे
>
> **- श्री. सिंधू संजय झुगरे, सरपंच, ग्रामपंचायत सायदे**

# सरपंच शरद पवार यांना आदर्श सरपंच पुरस्कार

**अहिल्यानगर: (समर्थ गांवकरी)**

निलेश लंके प्रतिष्ठान कडून चिचोंडी पाटीलचे कार्यसम्राट सरपंच शरदभाऊ खंडेराव पवार यांना आदर्श सरपंच पुरस्कारपारनेर येथे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात प्रदान करण्यात आला. यावेळी खासदार निलेश लंके व जिल्ह्यातील तालुक्यातील पदाधिकाऱ्यांच्या हस्ते सामाजिक, शैक्षणिक, राजकीय,कृषी व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल अनेकांचा गौरव करण्यात आला.



नगर तालुक्यातील लोकसंख्येने मोठ्या व राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या समजल्या जाणाऱ्या चिचोंडी पाटील ग्रामपंचायतचे कार्यसम्राट सरपंच शरद खंडेराव पवार यांनी सरपंच/उपसरपंच दोन पंचवार्षिक मध्ये या पदावर काम करत असताना गावचा चेहरा मोहरा बदलून टाकत गावात रस्ते पाणी लाईट त्या मूलभूत गरजांसह नागरिकांना लागणाऱ्या सर्वांगीण विकास साधत आरोग्य विभाग, कृषी विभाग,वनविभाग,महसूल विभाग, यांच्या थेट नागरिकांना विविध योजना चा लाभ ऑगस्ट क्रांती पंधरवड्याच्या माध्यमातून मिळवून दिला. गावात १५ मेगावाट सोलर प्रकल्प आणून शेतकऱ्यांना शेतीपंपाची दिवसभर अखंडित पूर्ण दाबाने वीज मिळवून दिली. तंटामुक्तीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे,ग्रामस्थांचे व्यापाऱ्यांचे गावातील विविध प्रकारचे तंटे पोलीस स्टेशन तहसील कचेरीत कोर्टात न पाठवता थेट शेतकऱ्यांच्या बांधावरच मिटवलेले आहेत.

सरपंचांनी स्वखर्चातून आरोग्य आपत्कालीन व्यवस्थेसाठी ॲम्बुलन्स, स्वर्गरथ,दशक्रिया विधीसाठी प्रवचन ओटा सेड, गावात सार्वजनिक ठिकाणी मंदिर परिसरात बाकडे,गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांसह थेट मदत, पालक नसणाऱ्या विद्यार्थ्यांना शालेय फी साठी मदत यासारख्या अनेक स्वखर्चातून मदतीने नागरिकांना केलेले आहेत.

गावातील अतिक्रमणासंदर्भात स्थानिक ग्रामस्थांच्या अर्जावर धडक कारवाई करत बोगस अतिक्रमणाच्या नोंदी रद्द करून थेट अनेक वर्षाचे रस्त्यावरील चौकातील अतिक्रमण काढून नागरिकांचे रस्ते खुले करून दिलेले आहेत व काही अतिक्रमणावर कायदेशीर कारवाई चालू ठेवलेली आहे.

नगर तालुक्यात अग्रगण्य काम सर्व विकासाच्या योजना प्रामुख्याने राबवणारे धडाडीचे,दमदार कार्यसम्राट सरपंच शरदभाऊ खंडेराव पवार यांना यावरील कार्यालय निलेश लंके प्रतिष्ठान, आपला मावळा महाराष्ट्र राज्य प्रतिष्ठान यांच्या वतीने आदर्श सरपंच पुरस्कार देण्यात आल्याबद्दल सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव सरपंच शरद भाऊ पवार यांचा होत आहे.

आदर्श सरपंच शरद पवार यांनी बोलताना सांगितले की निलेश लंके प्रतिष्ठान व आपला मावळा महाराष्ट्र राज्य प्रतिष्ठान चे सामाजिक शैक्षणिक राजकीय कृषी व विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांच्या पाठीवर शाबासकीची थाप टाकून आणखी बळ दिल्याबद्दल व माझ्यासह आदर्श शिक्षक पुरस्कार आरिफ बेग सर यांना देऊन चिचोंडी पाटील गावाला दोन आदर्श पुरस्कार दिल्याबद्दल खासदार लंके प्रतिष्ठानचे आभार मानले व सर्व पुरस्कार मिळालेल्या मान्यवरांचे अभिनंदन करून प्रतिष्ठानचे आभार मानले.

# ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांना 'भारत रत्न' देण्याची मागणी

- समस्त माळी समाज महामंडळ ट्रस्टचे डांग जिल्हा कलेक्टराना निवेदन

**डांग-गुजरात : (समर्थ गांवकरी)**



डांग जिल्ह्याच्या मुख्यालय आहवा येथे समस्त माळी समाज महामंडळ ट्रस्टच्या वतीने महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांना मरणोत्तर देशातील सर्वोच्च नागरी सन्मान 'भारत रत्न' प्रदान करण्याची मागणी करत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, फुले दांपत्यांनी आपले संपूर्ण आयुष्य मागास, शोषित आणि वंचित घटकांच्या उन्नतीसाठी समर्पित केले. समाजात शिक्षण, समानता आणि स्त्री सक्षमीकरणाचा दीप त्यांनी प्रज्वलित केला. महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली, तर सावित्रीबाई फुले या देशातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या आणि त्यांनी महिलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. फुले दांपत्यांनी मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली,बालहत्याविरोधी केंद्र स्थापन केले तसेच कामगारांसाठी रात्रीच्या शाळा चालवून समाजसुधारणेचे भगीरथ कार्य केले. त्यांच्या या ऐतिहासिक आणि मानवतावादी योगदानाचा गौरव म्हणून त्यांना 'भारत रत्न' सन्मान देण्यात यावा, अशी ठाम मागणी करण्यात आली.

यावेळी राजेंद्र सोनवणे, राजेंद्र महाजन, दीपक महाजन, हिरामण महाजन, धनंजय महाजन, सागर महाजन, प्रज्ञेश माळी आणि संजय माळी यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर विद्यालयाचे एनएमएमएस परीक्षेत घवघवीत यश



**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**

भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या आर्थिक दृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या साठी असणारी राष्ट्रीय साधन-सह-गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना. एन. एम.एम. एस. या स्कॉलरशिप परीक्षेत महात्मा बसवेश्वर माध्यमिक विद्यालय अर्धापूर येथील, शाळेतील तेरा विद्यार्थी या स्कॉलरशिप परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थिनी मिळवलेल्या यशाबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचा, शाळेच्या वतीने . याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका राऊबाई बिरादार (शेटे) यांनी पुष्पहार देऊन सन्मान केला. याप्रसंगी शाळेतील शिक्षक विजय दुगावकर, जेठन पवार, संतोष पिंपरे, वैशाली शिंदे, शिवकुमार शेटे व व विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या या यशस्वीते बद्दल संस्थेचे सचिव पंडितराव लंगडे, डॉ.विशाल लंगडे, डॉ. रघुनाथ शेटे यांनी अभिनंदन केले.

# भक्ती आणि शक्तीचा संगम

**जामखेड : (समर्थ गांवकरी)**

जामखेड येथील विठ्ठल मंदिर जामखेड येथे दि. २७ पासून परंपरागत जगद्गुरु संत तुकाराम महाराज बीजोत्सव व छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव सोहळ्याला भक्तीमय वातावरणात भव्य प्रारंभ होत आहे. तब्बल ३८ वर्षांची अखंड परंपरा लाभलेल्या या सप्ताह सोहळ्याची परंपरा आजही त्याच उत्साहात व श्रद्धेने जपली जात आहे. या सप्ताहात विविध नामांकित कीर्तनकारांच्या कीर्तनांचे आयोजन करण्यात आले असून दररोज मोठ्या संख्येने भाविकांची उपस्थिती अपेक्षित आहे. सर्व भक्तांसाठी अन्नदानाचीही व्यवस्था जागेवर करण्यात आली आहे.सप्ताहादरम्यान तुकाराम गाथा पारायण तसेच शिवचरित्रावर आधारित "शिवरायाचे आठवावे रूप" हा वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

# दादा चौधरी मराठी शाळेत "मराठी राजभाषा गौरव" दिन साजरा

- सेवा इंटरनॅशनल अक्षर भारती यांच्या सहकार्याने ग्रंथालयाची स्थापना
- मोबाईल पासून दूर राहण्यासाठी मुलांना वाचनाची प्रेरणा मिळावी- गायत्री कोल्हे

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**




सेवा इंटरनॅशनल अक्षर भारती या संस्थेची स्थापना २००७ साली अनुराग अग्रवाल यांनी केली आहे. वाचन प्रकल्प हा उद्देश ठेवून संस्थेने प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना साडेतीनशे पुस्तके नुसार माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना एक हजार पुस्तके मोफत देण्याचे काम सुरू केले आहे.अहिल्यानगर येथे ६९ शाळेमध्ये हा वाचन प्रकल्प सुरू आहे. सध्याच्या युगामध्ये विद्यार्थ्यांनी मोबाईल पासून दूर राहण्यासाठी वाचनाची आवड निर्माण होणे आवश्यक आहे.वंचित मुलांना दर्जेदार पुस्तके उपलब्ध करून देणे,ज्ञानाचा प्रसार करणे, मुलांचा सर्वांगीण विकास करणे. हा उद्देश ठेवून संस्थेचा वाचन प्रकल्प कार्यक्रम सुरू आहे.असे प्रतिपादन अक्षर भारतीचे शाळा समन्वय गायत्री कोल्हे यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी मराठी शाळेत "मराठी राजभाषा गौरव" दिनानिमित्त सेवा इंटरनॅशनल अक्षर भारती संस्थेच्या सहकार्याने ग्रंथालयाची स्थापना करण्यात आली. याप्रसंगी अक्षर भारती शाळा समन्वयक गायत्री कोल्हे,कविता गावित,मुख्याध्यापक सुभाष येवले,दिलीप परसपाटकी, मीनाक्षी गणगले ,सुनिता देवराव,शितल पवार,प्रिया आहिरे,मंगल पवार आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्याध्यापक सुभाष येवले म्हणाले,मराठी राजभाषेचा गौरव दिन उत्साहाने साजरा होत आहे. वाचन प्रकल्प हा अक्षर भारती संस्थेचा उपक्रम कौतुकास्पद आहे. मुलांसाठी सुरू केलेल्या ग्रंथालयात घडणारी शाळा,चला गाणी गाऊया,गाण्याचे पुस्तक, मामाच्या गावाला,सुभाष चंद्र बोस,शिवरायांची राजमुद्रा, चतुर बिरबल,माझी शाळा, मित्र असावे तसे,शहाणी सोना अशी ऐतिहासिक,वैज्ञानिक, गोष्टीची, मनोरंजन व चित्र स्वरूपातील शैक्षणिक पुस्तके उपलब्ध करून दिली आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रिया अहिरे यांनी केले.

# श्री ढोकेश्वर विद्यालय कॉपीमुक्त

- विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचे परीक्षा केंद्रास सहकार्य : प्राचार्य खिलारी

**(समर्थ गांवकरी)**



अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, इयत्ता बारावी बोर्ड परीक्षा 10 फेब्रुवारी पासून सुरळीतपणे सुरू आहे. जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत कॉपीमुक्त अभियान विद्यालयात राबविले. विद्यार्थ्यांना कॉपीमुक्त अभियानाची शपथ दिली. सर्व वर्गखोल्या व बाहेरील परिसरात 54 सी.सी.टी.व्ही. कॅमेरे सुरु आहेत. विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांचे परीक्षा केंद्रास सहकार्य मिळाल्यामुळेच इयत्ता बारावीची बोर्ड परीक्षा कॉपीमुक्त झाल्याचे केंद्र संचालक तथा प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी यांनी सांगितले आहे. या परीक्षेसाठी प्रा. श्री. विजय सोबले, प्रा. श्री. अशोक गांगड उपकेंद्रसंचालक आहेत. प्रा. श्री. योगेश मांडगे परीक्षेचे पूर्ण नियोजन करत असून, त्यांना प्रा. महानवर, श्री. आतिष झावरे, श्री. भाऊसाहेब बांबेरे व विद्यालयातील सर्व सेवकांचे सहकार्य लाभले आहे. परीक्षेच्या कालावधीत बाहेरचा उपद्रव होऊ नये म्हणून पोलीस यंत्रणा कार्यरत आहे. बारावीच्या पहिल्याच पेपरला संस्थेचे गव्हर्निंग कौन्सिल सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. लहूशेठ जाधव, उपाध्यक्ष शिवराज भालके, ॲड. बाबासाहेब खिलारी पा., प्रकाश इघे सर, शिवाजी काका खिलारी पा., पत्रकार बबनराव गायखे सर, शरद झावरे, दादा भालेकर, पप्पूशेठ पायमोडे, विनोद गायकवाड, गणेश जगदाळे, गंगाधर धावडे, संतोष कोरडे, संजय मोरे, बापूसाहेब रांधवन यांनी विद्यालयात उपस्थित राहून विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.परीक्षेच्या कालावधीत पुणे बोर्डाकडून भरारी व बैठे पथकाचे नियोजन असल्यामुळे या कालावधीत पारनेर पंचायत समितीचे बी.डी.ओ. सोनकुसळे साहेब, अहिल्यानगर जिल्ह्याचे कृषी अधिकारी, श्री. शिंदे साहेब, तालुका कृषी अधिकारी श्री. उस्मान शेख साहेब, पारनेर केंद्राचे कस्टडी प्रमुख दिनेश लाळगे साहेब, शिक्षण विस्तार अधिकारी श्री. पिंपळकर साहेब, श्री. गवळी साहेब व श्री. ढवळे साहेब, केंद्रप्रमुख श्री. आंधळे साहेब, ग्राममहसूल अधिकारी रायपेल्ली मॅडम व सारिका भवर मॅडम, श्री. प्रशांत वाळुंज, श्री. योगेश धुमाळ, सौ. शोभा हिरे, सुनीता झावरे, तेजश्री झावरे, विजया झावरे, सुनीता भालेकर, सिमा ढूस यांचे पथकाने प्रत्येक पेपरच्या कालावधीत, परीक्षा केंद्रात उपस्थित राहून, परीक्षा कॉपीमुक्त होण्यास सहकार्य केले. श्री. लाळगे साहेब यांच्या नियोजनातून ड्रोन कॅमेरा ची व्यवस्था झाली.

त्यामुळे बाहेरून कोणताच उपद्रव झाला नाही. आज अखेर कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेचे बारा विषयाचे पेपर अतिशय शांततेत आणि कॉपीमुक्त वातावरणात झाले. आज अखेर या केंद्रावर एकही कॉपी केस झाली नाही. भूगोल, इतिहास या दोन विषयांचे पेपर सात आणि नऊ मार्च रोजी होणार आहे.

# रानडुकराच्या हल्ल्यात महामार्गाचे पोलीस कर्मचारी जखमी

**अर्धापूरः (समर्थ गांवकरी)**

महामार्गाचे पोलीस कर्मचारी अर्धापूर बायपास रोडवर वाहनावर केसेस करीत असताना पाठीमागून आलेल्या रानडुकरांनी जोरदार धडक दिल्याने कर्मचारी जखमी झाल्याची घटना दि.२७ शुक्रवारी रोजी घडली असल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली आहे. महामार्गाचे पोलीस पोलीस कर्मचारी कर्तव्य बजावत असतांना रानडुकराने धडक दिल्याने डाव्या पायाच्या मांडीला दुखापत झाली आहे. जखमी पोलीस कर्मचारी सयाजी दत्ता कदम यांना तात्काळ अर्धापूर येथील ग्राम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून उपचार सुरू असल्याची माहिती महामार्ग पोलिसांनी दिली आहे.

# नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक विद्यालयाला राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत उज्ज्वल यश!



**डोंगरगाव : (समर्थ गांवकरी)**

ता. अकोले येथील डोंगरगाव मधील नेताजी सुभाषचंद्र बोस माध्यमिक विद्यालयाने राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत यशाची परंपरा कायम राखली आहे. इयत्ता आठवीतील चार विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल ऐंशी टक्के लागला आहे. या शिष्यवृत्ती परीक्षेत स्पंदन ज्ञानेश्वर उगले याला ११७ गुण, आयुष अमोल उगले याला ७८ गुण, संस्कृती अमित सहाणे हिला ७५ गुण तर पलक विकास निळे हिला ७५ गुण मिळाले असून सर्व विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य संपादन केले आहे. या यशासाठी विभाग प्रमुख भास्कर वाळुंज यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका, स्थानिक शाळा समिती, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद, पालक तसेच ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे. विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची ही आणखी एक उल्लेखनीय कामगिरी मानली जात आहे.

# मार्च सुरूवातीलाच सावरमाळ येथे पाण्याची भीषण टंचाई

- प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांना पाण्याची गैरसोय; व्यवस्थेवर रुग्ण नाराज

**मुखेड : (समर्थ गांवकरी)**

मार्च महिन्याला सुरुवात होताच पाण्याची भीषण टंचाई मुखेड तालुक्यातील सावरमाळ येथे निर्माण झाली आहे. जसा-जसा उन्हाळा जवळ जवळ येऊ लागतो तसं-तसं महिलांच्या मनामध्ये पाण्याबद्दल धडकी भरत असते. उन्हाळ्याचे चार महिने माहेरी गेलेलं बरं होईल असा विचार सावरमाळ येथील महिलांच्या मनात येत असतो. वर्षानुवर्षे या गावात पाण्याची भीषण टंचाई भासत असते. याबाबत प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रार करून सुद्धा प्रशासन याकडे जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचं मत येथील नागरिक व रुग्णांनी व्यक्त केला आहे. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र असल्यामुळे परिसरातील रुग्ण शस्त्रक्रिया किंवा डिलिव्हरीसाटी दूर दुरून येत असतात.इथे आल्यानंतर त्यांना पुरेसं पाणी मिळत नसल्याने पाण्यासाठी वन वन भटकावं लागतं. सर्वसामान्य रुग्णांना प्रायव्हेट दवाखाना परवडत नसल्यामुळे गोरगरीब रुग्ण सरकारी दवाखान्यामध्ये ॲडमिट होतात. अशा ठिकाणी त्यांना अनेक समस्याला तोंड द्यावे लागते. दरम्यान शासनाला एकच विनंती आहे की दवाखान्यामध्ये एखादा बोर मारून पाण्याची अडचण दूर करावी अशी विनंती रुग्णाकडून सध्या होताना दिसत आहे. म्हणून सावरमाळ येथील पाण्याची भीषण टंचाई लक्षात घेऊन यावर उपाययोजना लवकरात लवकर करावी अशी मागणी सावरमाळ येथील नागरिक व रुग्णांनी केली आहे.

# जगातील फक्त नगरची भूमी अवतार मेहेरबाबानी निवडली

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अवतार मेहेरबाबाच्या जन्मोस्तव दि २५ फेबुरवारी रोजी जगात मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्या निमित्ताने नगरमध्ये कार्यक्रम होत आहे.



मेहरबाबा जगात फिरले पण त्यांनी अहमदनगरची भूमी निवडली व येथेच स्थिरावले,ते नगरजवळील वांबोरी रोडवरील पिपळगाव माळवी येथील आश्रमात राहत असत तर त्याची समाधी अरणगाव येथे मेहेरबाद येथे आहे याठिकाणी सतत मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी व शांतीसाठी राज्यातून,भारतातून व जगातून येत असतात अशी माहिती त्यांच्या कार्या व आध्यत्मिक विषयी माहिती नगर सेन्टरचे अध्यक्ष डॉ. मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली. नगर जिल्हा संतांचा जिल्हा आहे.या ठिकाणी अनेक अवतारी पुरुष,साधुसंत होवुन गेलेले आहेत.ज्यांनी सर्वधर्म एकच आहे हा संदेश दिला.असेच अवतार मेहेरबाबा अहमदनगर मध्ये होते. त्यांचे असंख्य भक्त आज भारतातच नव्हे तर परदेशात सुद्धा आहेत. तसेच असंख्य आश्रमही आहेत. अवतार मेहेरबाबा सर्व धर्मावर प्रेम, सर्व धर्माची पूजा करीत,परंतु आपण कोणत्याच धर्माचे नाही किंवा कोणता नवीन धर्म स्थापन करुन मानवाला मानवा पासुन वेगवेगळे करुन त्यांच्यात भ्रम वाढवु इच्छित नाही असे मेहेरबाबा म्हणत.

मेहेरबाबांचा जन्म पुणे येथे २५फेब्रुवारी१८९४ रोजी झाला. कॉलेजनंतर ते अध्यात्मिक क्षेत्राकडे वळले. शिर्डीचे साईबाबा, शिर्डी जवळील साकुरीचे उपासनी महाराज,पुण्याचे हजरत बाबाजान,नागपूरचे ताजुद्दीन बाबा,दौंड जवळील केडगांव बेटचे नारायण महाराज हे त्यांचे अध्यात्मिक गुरु होते. सर्व जातीधर्मातील लोकांना मानवतेचा संदेश देत पुढे त्यांनी जगभर प्रवास केला. १९२३ साली बाबा अहमदनगरला प्रथम आले होते. त्यांच्या अरणगांव (मेहेराबाद) येथील कुटीवर सर्व धर्माचे प्रतीक म्हणुन सात रंगाचा ध्वज लावण्यात आला.याच ठिकाणी त्यांनी १९२५ला धर्मार्थ दवाखाना व मोफत शाळा सुरु केली.बाबांनी१० जुलै १९२५ ते शेवटपर्यंत म्हणजे ३१ जानेवारी १९६९, असे ४४ वर्षे मौनव्रत पाळले.या काळात ते कोणाशीच बोलले नाही.यातच त्यांनी भारतात अनेक ठिकाणी व१३ वेळा अध्यात्म प्रचारासाठी जगप्रवास केला. त्यांनी गॉडस स्पिक,लिसन ह्युमिनिटी, परफेक्ट मास्तर, अवतार आदी ग्रंथ लिहीले. जगात कोठेही माझे निधन झाले तरी माझी समाधी अरणगांव (मेहेराबाद)येथेच बांधावी असे बाबांनी आपल्या भक्तांना सांगुन ठेवले होते.हेच ठिकाण आता मेहेराबाद म्हणुन प्रसिद्ध आहे. शेवटचा काळ त्यांनी पिंपळगांव माळवी (मेहेराझाद) येथे घालविला. तेथेच त्यांचे ३१ जानेवारी१९६९ रोजी महानिर्वाण झाले.नंतर त्यांची समाधी मेहेराबाद येथे बांधण्यात आली. नगरमधील किंग्जरोडवर अवतार मेहेरबाबा ट्रस्टचे अवतार मेहेरबाबा केंद्र आहे. या ठिकाणाहुन सर्व कारभार पाहिला जातो.येथेही विविध कार्यक्रम सादर होत असतात. परदेशात ही बाबांचे अनेक आश्रम आहेत. अमेरिका,ऑस्ट्रेलिया,ग्रेट ब्रिटन,इराण आदी ३० देशात ४०० केंद्र असुन भारतात अडीच हजार केंद्र आहेत. जगातील सर्व केंद्रात एकमेकांना जय मेहेरबाबा म्हणुन ओळख दिली जाते.नगरमधील केंद्रात दर शनिवारी सायं. बाबांच्या जीवनावर प्रवचन व आरती होते.व मेहेराबाद येथे सकाळी व संध्याकाळी ७ वा.बाबांची आरती व भजन म्हटले जाते.आठवड्यातुन एक दिवस धार्मिक कार्यक्रम,शनिवारी किंवा रविवारी धार्मिक फिल्म,प्ले,नाटक दाखविले जाते. प्रत्येक केंद्रात दरवर्षी विविध उत्सव साजरे केले जातात. यामध्ये १० जुलै रोजी मौन सोहळा २४ तास पाळला जातो.१० जुलै १९२५ रोजी मेहेरबाबांनी मौनास प्रारंभ केला म्हणुन हा उत्सव केला जातो.१६ ऑक्टो.हा नविन जीवन सोहळा म्हणुन साजरा केला जातो.१६ ऑक्टो. १९४९ रोजी नविन जीवन म्हणुन बाबांनी दोन वर्षे पायी प्रवास केला.

म्हणुन बाबाप्रेमी नगर ते मेहेराबाद पायी दिंडी काढतात. ३१ जाने.हा बाबांचा अमरतीथी सोहळा फक्त मेहेराबाद येथेच साजरा केला जातो.३१ जाने.१९६९ या दिवशी बाबांचे महानिर्वाण झाले म्हणुन हा दिवस साजरा केला जातो.

# बालविवाह रोखणे ही प्रत्येकाची जबाबदारी : न्यायाधीश



## मिरजगाव येथे बालविवाह प्रतिबंधक कायद्यासंदर्भात जनजागृती कार्यक्रम

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

बाल विवाहाचे खूप मोठे दुष्परिणाम आहेत. बाल संरक्षणाबाबत अस्तित्वात असलेल्या कायद्यांची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. बालविवाह लावून देणारे कुटुंब व लग्नाला उपस्थित वराडी मंडळींवर देखील कायदेशीर कारवाई केली जाते.

बालविवाह रोखणे ही समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे. समाजात बालविवाहास प्रतिबंध घालण्यासाठी विद्यार्थ्यांसह प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा, स्वतःचे हक्काचे संरक्षण करावे, असे आवाहन कर्जत दिवाणी फौजदार न्यायालयाचे न्यायाधीश रामराव राऊत यांनी केले.

राज्यात शासनाने बालविवाह कायद्याच्या जनजागृतीसाठी शंभर दिवसांचा विशेष कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याअनुषंगाने कर्जत तालुका वकील संघ आणि तालुका विधी सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने भारत विद्यालय, मिरजगाव येथे 'बाल विवाह मुक्त भारत' अभियानांतर्गत कायदेविषयक जनजागृती शिबिराचे शुक्रवारी, दि.२७ फेब्रुवारी रोजी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांना कायदेविषयक मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक खुरांगे सर हे होते.

या कार्यक्रमास कर्जत तालुका वकील संघाचे अध्यक्ष ॲड.संग्राम ढेरे, उपाध्यक्ष ॲड.दत्तात्रय चव्हाण, सचिव ॲड. अविनाश मते, ज्येष्ठ विधीज्ञ ॲड.अभय खेतमाळस, ॲड.शफीक शेख, ॲड. अनिल म्हेत्रे, ॲड. ओंकार कुलकर्णी, ॲड. विठ्ठल सातव, ॲड.विश्वास घालमे, ॲड.सलमान पठाण, न्यायालयीन कर्मचारी निकाळजे, डोळझाके यांच्यासह आदी प्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते. यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना न्यायाधीश राऊत म्हणाले, बालविवाह प्रतिबंधक कायदा २००६ नुसार मुलींचे किमान वय १८ वर्षे व मुलांचे २१ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. बालविवाहामध्ये केवळ पालकच नव्हे तर प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष मदत करणारे सर्वजण दोषी ठरतात. त्यांच्यावर कायदेशीर कडक कारवाई होऊ शकते. लवकर लग्न झाल्यास मुलींच्या आरोग्यावर, शिक्षणावर व करिअरवर परिणाम होतो. अपुरी शारीरिक वाढ, पोषणाचा अभाव व मानसिक तयारी नसताना संसाराची जबाबदारी टाकली जाते, त्यामुळे भवितव्य धोक्यात येते. विद्यार्थ्यांनी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, स्वतःवर विश्वास ठेवावा, बालविवाह प्रतिबंध कायदा हा मुलींना संरक्षण देणारा कायदा आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी ॲड. ढेरे म्हणाले, शिक्षण हा आयुष्याचा दागिना आहे. लवकर लग्नामुळे स्वप्ने अधुरी राहतात. बालविवाह हा गुन्हा असून त्यात सहभागी सर्वांवर गुन्हा दाखल होऊ शकतो.

# धनगरवाडी येथे जल अर्पण दिवस साजरा

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

- धनगरवाडी गावात ग्रामस्थांनी उत्साहात साजरा केला जल अर्पण दिवस

गावकऱ्यांच्या सकारात्मक सहकार्याच्या दृष्टिकोनातून जल जीवन मिशनच्या 'हर घर, नल से जल' योजनेतून गावातील पाणी पुरवठा योजना यशस्वी करण्यात तरूणाईचा मोठे योगदान आहे. भविष्यात ही योजना दीर्घकाळ टिकून राहण्यासाठी वितरण वाहिनी सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने गावकऱ्यांनी पावले उचलली आहेत. पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी गावातील सर्वांचे योगदान न विसरण्यासारखे आहे. गावात जलजीवन मिशनने उभारलेल्या पाणीपुरवठा ताब्यात घेऊन यशस्वीपणे चालवावी व गावची पाण्याची तहान भागवावी, असे आवाहन कार्यकारी अभियंता राहूल रावसाहेब, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक मयूरकुमार आंदेलवाड यांनी केले आहे. नांदेड तालुक्यातील धनगरवाडी ग्रामपंचायतमध्ये जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. गावातील प्रत्येक कुटुंबाला नळाद्वारे शुद्ध पाणी मिळत आहे, पाणी पुरवठा योजना गावाला हस्तांतरण दिवस, जल अर्पण दिवस आज विविध उपक्रम राबवून ग्रामस्थांनी उत्साहाने साजरा करण्यात आला. गावातील पाणी पुरवठा योजना यापुढेही निरंतर सुरू ठेवू गावाला या पुढे नळाव्दारेच नियमित पाणी पुरवठा सुरू राहिल असे आश्वासन सरपंच अमित संजय पगडे, ग्रामपंचायत आधिकारी रूख्माजी मुदखेडे आणि गावकर्यांनी प्रशासनाला दिले आहे.

जल अर्पण दिनाचे औचित्य साधून सर्वप्रथम सकाळी नागरिकांच्या वतीने धगरवाडी येथे ग्राम सफाई करण्यात आली. त्यानंतर जल अर्पण दिवस कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली, ग्रामपंचायत कार्यालयापासून नळ योजनेच्या पाणी टाकी, गावातील मुख्य रस्त्याने जल रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये शालेय विद्यार्थी, महिला, गावकारी, गावातील शासकीय कर्मचारी यांनी सहभाग घेतला. तर त्यांनी पाणी विषयक घोषवाक्य फलक हातात घेऊन घोषणा दिल्या. उपअभियंता एस. डी. देशमुख, रॅली दरम्यान ग्राम आरोग्य पोषण आहार पाणीपुरवठा स्वच्छता समिती, ग्रामपंचायत पदाधिकारी यांनी नागरिकांना नळ पाणीपुरवठा योजनेच्या विविध अपंगाबाबत प्रत्यक्ष स्थळावर माहिती दिली. त्यानंतर नळाच्या पाण्याचे कलश यामध्ये संकलन करण्यात आले. तसेच टाकी परिसरात जल पुजन करण्यात आले. जल संकलित करून जल कलशांची मिरवणूक रॅलीच्या माध्यमातून गावातून काढण्यात आली.

# मनपाच्या प्रभाग कौठा येथे सौर ऊर्जा बल्ब मंदिर व पुतळा परिसरातील आठ ठिकाणी कार्यान्वित, प्रकाशमय भाग



**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रमांक 19 मधील जुना कौठा भागातील मंदिर व छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, स्मशानभूमी, जुना कौठा,विकास नगर बालाजी मंदिर, वृंदावन कॉलनी हनुमान मंदिर,सह अंतर्गत भागातील मोकळ्या जागेत नवनिर्वाचित लोकप्रतिनिधीचा पुढाकाराने व मंदिर समितीच्या विश्वस्त यांनी केलेल्या मागणीनुसार जवळपास आठ ठिकाणी सौर ऊर्जा बल्ब बसविण्यात आल्याने भाविक भक्त यांच्या सह नागरीकांना यांच्या फायदा झाला असून परिसरातील सौंदर्य मध्ये भर पडली असून परिसर प्रकाशमय झाला आहे.

नावा मनपाच्या प्रभाग क्रमांक 19 मधील जुना कौठा प्रभागातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, स्मशानभूमी, महादेव मंदिर जुना कौठा सह , श्रीपाद नगर येथील स्वामी समर्थ, दत्तमंदिर, नर्मदेश्वर मंदिर श्रीपाद नगर सह, बालाजी मंदिर विकास नगर, वृंदावन कॉलनी,प्रभागातील अंतर्गत असलेल्या भागात अंधाराचे साम्राज्य असल्याने भाविक भक्तांसह नागरीकांना अंधारात जावे लागत असल्याने अंधाराचे साम्राज्य पसरले होते,विश्वस्त समिती पदाधिकारी व नागरिकांनी नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी सौ.अनुराधा राजु पाटील काळे,सौ. दिपाली संतोष मोरे, सुलोचना धोंडीबाराव काकडे, अभिषेक सौदे यांच्या कडे मागणी करून संबंधित भागात विघुत बल्प लावण्याची मागणी केली होती तर स्वामी समर्थ,दंत मंदिर विश्वस्त समिती अध्यक्ष विठ्ठल गोविंदराव काळे पाटील यांनी सतत पाठपुरावा करून लोकप्रतिनिधीचा पुढाकाराने जवळ पास आठ ठिकाणी सौरऊर्जा बल्प लावण्यात आल्यामुळे मंदिर परिसर व स्मशानभूमी, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर प्रकाशमय झाला आहे, यामुळे रात्री उशिरापर्यंत भाविक भक्त सह महिला युवक जेष्ठ नागरिक हे दर्शन सह परिसरात फेरफटका मारत आहेत.

# स्वारातीम विद्यापीठात 'मराठी भाषा गौरव दिन' उत्साहात साजरा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलात कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंती दिनानिमित्त व मराठी भाषा गौरव दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी भाषा संकुलाचे संचालक प्रा. दिलीप चव्हाण, इंग्रजी विभागप्रमुख प्रा. शैलजा वाडीकर, मराठी विभागाचे प्रा. वैजनाथ अनमुलवाड हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुसुमाग्रजांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. मराठी भाषा गौरव दिन साजरे करण्यापाठीमागची भूमिका व मराठीचे महत्त्व याविषयी प्रा. डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी सविस्तर मांडणी केली.

# मराठी भाषा गौरव दिनानिमित्त "मी मराठी "नाव साकारून केली जनजागृती

**जामखेड तालुका : (समर्थ गांवकरी)**

"मी मराठी" नावात 1850 विद्यार्थी सहभागी मराठी भाषेला मानवंदना दिली. रयत शिक्षण संस्थेच्या श्री नागेश विद्यालय जामखेड मध्ये नागेश विद्यालय व कन्या विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न झाला.

यावेळी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून सुरुवात करण्यात आली. एन एम एम एस परीक्षेमध्ये 80 विद्यार्थी पास झाले या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला या परीक्षेत विद्यालयातील १३ विद्यार्थ्यांनी १२० पेक्षा अधिक गुण मिळवून घवघवीत यश मिळवले प्रथम क्रमांक आयुष अविनाश बोधले व संचित संतोष खैरे (दोन्ही १४९ गुण) द्वितीय क्रमांक: भोंडवे यश महादेव (१४७ गुण) तृतीय क्रमांक: वराट यशराज शहादेव (१४५ गुण) चौथा क्रमांक: भवर यशराज शंकर (१४४ गुण) तसेच जाधव ओम, वटाणे ओंकार, माळी कृष्णा, धुमाळ सोहम, पवार अथर्व, तिवारी करण, जगताप अनिश आणि रेळेकर श्रेयश या विद्यार्थ्यांनीही १२० पेक्षा अधिक गुण मिळवून विशेष प्राविण्य मिळवले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशात मार्गदर्शक शिक्षकांचा मोठा वाटा आहे. बुद्धिमत्ता विभागाचे प्रमुख देशमुख एस.एस., विज्ञान विषयाचे मडके बी.के. व पठाण ए.एन., सामाजिक शास्त्राचे लटपटे डी.व्ही. आणि गणित विषयाचे चौधरे ए.बी. यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यांचा विद्यालय वतीने सन्मान करण्यात आला तसेच मराठी भाषा गौरव दिनानिमित्त विद्यार्थी बैठक रचनेत "मी मराठी" नाव साकारून करून मराठी भाषेला मानवंदना दिली. कला शिक्षक तथा एनसीसी ऑफिसर मयूर कृष्णाजी भोसले यांनी हे नाव साकारले. या मानवी रचनेच्या नावात 1850 विद्यार्थी शिक्षक झाले.



मराठी भाषा गौरव दिनाचा विजय असो, माझी भाषा मराठी , मी मराठी महाराष्ट्र माझा या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून निघाला. यावेळी प्रमुख उपस्थिती प्राचार्य मडके बि के, मुख्याध्यापिका श्रीम भोर आर आर,मोहन यादव,प्रा मांडे ए एन,गुरुकुल प्रमुख संतोष ससाणे, संभाजी इंगळे, संभाजी देशमुख, श्रीम ज्योती गोपालघरे, शंभूदेव बडे आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी श्रीमती ज्योती गोपाळघरे निलेश अनारसे संभाजी इंगळे, मोहन यादव आदींनी मनोगत व्यक्त केली.

# महावितरणचा सावळा गोंधळ; स्मार्ट मीटर व सोलार रीडिंगमध्ये तफावत

- नांदेड सह ग्रामीण भागात अचानक वीज तोडणी
- अचानक वीज तोडणीमुळे शाळांत परीक्षार्थींचा मनसंताप

**तामसा : (समर्थ गांवकरी)**




नांदेड सह ग्रामीण भागात महावितरण (एमएससीबी) च्या स्मार्ट मीटर व सोलार नेट-मीटरिंग रीडिंग प्रक्रियेमध्ये गंभीर गोंधळ निर्माण झाल्याची तक्रार ग्राहकांकडून होत आहे. कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने विध्यार्थी सह नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील अनेक नागरिकांनी घरांवर सौरऊर्जा प्रकल्प (सोलार रूफटॉप) बसवले आहेत. या ग्राहकांच्या म्हणण्यानुसार सोलार उत्पादनाचे रीडिंग कधी स्वयंचलितपणे घेतले जाते तर कधी महिनोनमहिने नोंदच होत नाही. परिणामी प्रत्यक्ष वापर आणि निर्मिती यामध्ये तफावत निर्माण होऊन अचानक जादा बिल आकारले जात असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. ग्राहकांनी एमएससीबी कार्यालयाशी संपर्क साधून स्पष्टीकरण मागितल्यास समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे सांगितले जाते. काहींना बिलाबाबत कोणतीही पूर्वकल्पना न देता थकीत रक्कम दाखवून वीजपुरवठा खंडित करण्यात आल्याच्या घटना समोर आल्या आहेत.

स्मार्ट मीटर रीडिंगमध्ये गोंधळ स्मार्ट मीटर प्रणालीद्वारे वीज वापर आणि सोलार ऊर्जा निर्मितीची माहिती स्वयंचलितपणे नोंदवली जाणे अपेक्षित असते. मात्र रीडिंग अनियमित घेतले जाणे, डेटा समक्रमणात अडथळे आणि बिलिंगमध्ये तफावत यामुळे ग्राहकांना अनपेक्षित आर्थिक भार सहन करावा लागत असल्याचे दिसून येत आहे.

अचानक वीज तोडणीचा दैनंदिन जीवनावर परिणाम वीजपुरवठा अचानक खंडित झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या दहावी, बारावी च्या परीक्षा सुरु असून तसेच ऑनलाइन अभ्यासावर परिणाम होत आहे. लघुउद्योग, घरून काम करणारे कर्मचारी आणि व्यावसायिक यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनाही अभ्यासात अडथळे निर्माण होत असल्याची पालकांची तक्रार आहे.

पूर्वसूचना व पारदर्शकतेची मागणी वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी एसएमएस किंवा लेखी सूचना देणे, सोलार व स्मार्ट मीटर रीडिंग नियमित व अचूक करणे, तसेच ग्राहकांच्या तक्रारींना तत्काळ प्रतिसाद देणे आवश्यक असल्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

नांदेड जिल्ह्यात वाढत्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर महावितरण प्रशासनाने रीडिंग प्रणालीतील त्रुटी दूर करून पारदर्शक व ग्राहकाभिमुख सेवा द्यावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आह..वीज खंडित करून महावितरण च्या तुगलकी कारभार मुळे झालेल्या या वीज तोडणी च्या विरोधात आंदोलन छेडण्यात येईल अशा इशारा भाजपा महिला मोर्चा तालुका अध्यक्ष ममता जोशी यांनी दिला..

# सहयोग कॅम्पस मध्ये मराठी भाषा गौरव दिन साजरा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

२७ फेब्रुवारी वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज) यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी हा दिवस राज्यभर "मराठी भाषा गौरव दिन" म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. त्यानिमित्त सहयोग सेवाभावी संस्थेच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मान्यवरांनी आपल्या भाषणातून कुसुमाग्रजांनी मराठी साहित्य, नाट्य, कविता आणि सामाजिक जाणीव जागृतीसाठी दिलेल्या अमूल्य योगदानाचा गौरवपूर्ण आढावा घेतला. मराठी भाषा ही ज्ञानभाषा म्हणून विकसित व्हावी यासाठी त्यांनी केलेले अथक परिश्रम, तसेच त्यांच्या साहित्यकृतींमधून व्यक्त झालेली सामाजिक बांधिलकी यांचा विशेष उल्लेख करण्यात आला.

# समाधी स्थळी चव्हाण कुटूंबीयांनी केले अभिवादन

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**



नांदेड तालुक्यातील वडगाव धनेगाव येथे समाधी स्थळी श्रद्धेय कै.सौ. कुसुमताई शंकररावजी चव्हाण यांच्या पुण्यतिथीनिमित्त निमित्त 27फेब्रुवारी रोजी सकाळी 09वाजता माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण, माजी आमदार अमिता भाभी चव्हाण,आमदार ॲड.सुजया चव्हाण, सुजाया चव्हाण यांच्या सह चव्हाण कुटूंबीय व उपस्थीत आमदार , लोकप्रतिनिधी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी 27 फेब्रुवारी रोजी सकाळी 09 वाजता , धनेगाव ता.जि.नांदेड येथे समाधी स्थळी फुलांची सजावट करण्यात आली होती, प्रारंभी खासदार अशोकराव चव्हाण यांच्या सह माजी आमदार अमिता भाभी चव्हाण, आमदार श्रीजया चव्हाण, सुजाया चव्हाण व कुटुंबातील सदस्य यांनी समाधीवर विधीवत प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला,कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेडचे सभापती संजय लहानकर, नांदेड वाघाळा शहर महानगर पालिका महापौर सौ.ज्योती संतोष मुळे, मनपा सभागृह नेते ॲड.महेश कनकदंडे, माजी महापौर बलंवतसिंग गाडीवाले,भाजपा नगरसेवक विरेंद्र सिंघ गाडीवाले,सुमित मुथा, सिडको नगरसेवक प्रतिनिधी सतिश बस्वदे,राजु लांडगे,माजी नगरसेवक बालाजी जाधव ,संजय इंगेवाड मंडळ अध्यक्ष भालचंद्र पवळे,,माजी जिल्हा परिषद सदस्य गंगाप्रसाद काकडे मनोहर पाटील शिंदे,धनेगाव सरपंच पिंटू ऊर्फ गंगाधर पाटील शिंदे ,डॉ.नरेश रायेवार,डॉ. अशोक कलंत्री,दलीत मित्र माधवराव अंबटवार,दतु देशमुख,,आनंदराव गायकवाड, अहातखॉन पठाण, बालाजी पांडागळे, मारोती शंखतिरथर्तकर,विजय यवनकर, माधव कदम,मिनलताई पाटील खतगावकर, माजी महापौर शैलजा स्वामी,माजी नगरसेविका सौ.ललिता शिंदे,पार्वती कोरडे,श्रीमती सुरेखा नेरलकर ,महादेवी मठपती,यांच्या सह जिल्ह्यातील भाजपा पक्षाचे पदाधिकारी व महिला पदाधिकारी, जेष्ठ कार्यकर्ते, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील पदाधिकारी व नागरिक,पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'सेक्युलॅरिझम'चा खरा अर्थ जाणणे आवश्यक : प्रा. शेषराव मोरे

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**



आज धर्माने भारतीय समाजजीवन व राजकारणाचा ताबा घेतला आहे. राज्यघटनेतील 'सेक्युलॅरिझम'चा खरा अर्थ कुणी समजून घेत नाही. भारतीय राज्यघटनेत 'सेक्युलॅरिझम' हा शब्द बेचाळीसाव्या दुरुस्तीपूर्वी नव्हता, हे खरे नव्हते. 'सेक्युलॅरिझम' या शब्दाचा 'धर्मनिरपेक्षता' असा केला जाणारा अनुवाद चुकीचा आहे. 'धर्म' या शब्दाचा अर्थ निरनिराळ्या पद्धतीने घेतला जातो. भारतीय घटना धर्माचा वाट्टेल तसा अर्थ घेण्यास प्रतिबंध करते. धर्म आणि सेक्युलर ह्या स्वतंत्र संकल्पना आहेत.", असे मत ज्येष्ठ विचारवंत प्रा. शेषराव मोरे यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात बोलताना व्यक्त केले. डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्ताने डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्राद्वारे आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. "भारतीय राज्यघटनेने सुरुवातीपासून धर्मसंस्थेवर मर्यादा घातलेली होती. कायदा व सुव्यवस्था यांच्या अटीवर धर्माचे पालन करणे बंधनकारक आहे. पारलौकिक जीवन हे धर्माच्या कक्षेत असले तरी ऐहिक जीवन हे राज्यघटनेने संचालित केले जाते. सामाजिक स्वास्थ्याला बाधा येईल अशा रितीने धर्माचे पालन करता येत नाही. यासंबंधी सर्वोच्च न्यायालयाने विविध निकालात राज्यघटनेतील 'सेक्युलॅरिझम' या संकल्पनेवर विविध निर्णय देऊन ही संकल्पना स्पष्ट केले आहे.

# स्वसंरक्षण आधुनिक काळाची गरज : ॲड. पदमावती पाटील

**आळंदी : (समर्थ गांवकरी)**

सावित्रीबाई फुले पुणे, विद्यापीठ पुणे व श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, शरदचंद्र पवार कला आणि वाणिज्य महाविद्यालय, डुडुळगाव, आळंदी यांच्या संयुक्त विद्यमाने " निर्भय कन्या अभियान " अंतर्गत सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग आणि अँटी रॅगिंग या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते .



या प्रसंगी पाहुण्यांचा परिचय प्रा. दिपाली ताम्हाणे यांनी करून दिला. विद्यार्थी विकास मंडळाचे प्रमुख प्रा. माणिक कसाब यांनी प्रस्ताविक प्रसंगी संबंधित कार्यक्रम विद्यार्थिनींच्या स्वयसंरक्षणासाठी अत्यंत महत्वपूर्ण असून त्यासाठी 'सेल्फ डिफेन्स ट्रेनिंग आणि अँटी रॅगिंग' ही कार्यशाळा आयोजित करणे कसे महत्त्वाचे आहे या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली.

ॲड. पदमावती पाटील सहसचिव- पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशन, यांनी अँटी रॅगिंग या विषयाला न्याय देतांना अँटी रॅगिंग ही संकल्पना काय आहे? त्याचे परिणाम काय होतात? त्यासाठी भारतीय संविधानामध्ये कोणत्या कलमांची तरतूद केलेली असून त्या बरोबरच संबंधित कायद्याला अनुसरून विद्यार्थिनीच्या बाबतीत कशी भूमिका घेणे आवश्यक आहे या संदर्भात सविस्तर विवेचन करून महिलांच्या सुरक्षेच्या संदर्भात भारतीय राज्यघटनेत कसे कायद्याचे नियोजन केलेले असून महिलांना त्या कायद्यांचा कसा फायदा होतो या संदर्भात मत मांडून स्वसंरक्षण काळाची गरज आहे या बाबत विविध उदाहरणांचे दाखले देत सखोल मार्गदर्शन केले.

सेल्फ डिफेन्स या विषयावर मत मांडतांना कु.पायल पाटील- तायकांडो कराटे प्रशिक्षक, यांनी पी.पी.टी.च्या माध्यमातून सेल्फ डिफेन्स म्हणजे काय? त्याचा उदय कधी झाला तसेच स्वसंरक्षणासाठी प्रशिक्षणाची गरज आहे त्याचबरोबर कराटेचे विविध प्रकार कोणते आहेत? लाठी काठी, नन चॉकू , हे प्रकार स्वसंरक्षणासाठी कसे महत्वपूर्ण आहेत या संदर्भात ऐतिहासिक दाखले देत प्रात्यक्षिकाद्वारे विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

महात्मा फुले महाविद्यालयाच्या मानसशास्त्र विभागातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. शितल जाधव यांनी ' स्वजाणीव व आरोग्य ' या विषयावर भाष्य करतांना आधुनिक काळात प्रत्येक स्त्रीने स्वतःला ओळखण्याची आवश्यकता प्रतिपादन करून स्त्री ही वेळेनुसार कशाप्रकारे आई,बहीण,बायको, वाघीण तसेच नागिन बनते या संदर्भात ऐतिहासिक दाखले देऊन अनमोल मार्गदर्शन केले. तसेच आपले अस्तित्व सिद्ध करण्यासाठी स्त्रीने आपल्या आरोग्याची काळजी कशा प्रकारे घेतली पाहिजे हे वेगवेगळ्या पद्धतीने सांगितले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पांडुरंग मिसाळ यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना स्त्री पुरुष समानता आधुनिक काळात कशी महत्त्वाची असून पुरुष मानसिकता बदलण्याची आवश्यकता प्रतिपादित केली. सद्य परिस्थितीत विद्यार्थिनींनी स्वसंरक्षणासाठी कसे तत्पर असले पाहिजे तसेच यासाठी स्वसंरक्षणाच्या विविध प्रकाराचे अवलोकन करून स्वसंरक्षणाचे प्रकार स्वीकारण्याची आवश्यकता विशद केली. या प्रसंगी उपस्थित सर्व विद्यार्थिनींना प्रमाणपत्राचे वाटप मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळाचे खनिजदान मयूर मुरलीधर ढमाले यांचे अनमोल मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमासाठी प्रवीण भावे,कार्यालयीन अधीक्षक,प्रा.प्रफुल्ल जाधव,बी.बी.ए.सी.ए.विभाग प्रमुख प्रा. रोहित कांबळे, परीक्षा विभाग प्रमुख,प्रा. डॉ. देवानंद गोरडवार, सांस्कृतिक विभाग प्रमुख, प्रा.प्रभाकर गायकवाड, प्रा.डॉ. रंजीत कदम, प्रा. रेखा सुतार,प्रा. दिपाली सोनवणे, प्रा. रूपाली औटे,प्रा.पूजा खेडकर,प्रा. प्राजक्ता पवार,ग्रंथालय विभाग प्रमुख,सौ. वर्षा ताजने, सचिन गावडे, वैभव बडवे,श्रीकांत कांबळे इत्यादी विभाग प्रमुख, सहाय्यक प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि कला,वाणिज्य व बी.बी.ए.(सी. ए.) बी.सी.ए शाखेतील विद्यार्थिनीची उपस्थिती होती.